संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा






मुन्ना शेठ दिघे

यांना जन्मदिनी दिर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा...!

*शुभेच्छुक: पियुष गांधी, आकाश बेरड

रजि नं. ११४३१-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २९.११.२०२४ | अंक नं. २२७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

राहण्याची सोय
मामाचा मळा
कृषी पर्यटन केंद्र
*पत्ता : नगर-सोलापूर रोड, रुईछत्तीसी, अ.नगर
Water Park




MO: 98 90 77 25 20 / 97 30 97 97 00

नगर-सोलापूर रोड, नगरपासून १५ मिनिट अंतरावर.रुईछत्तीसी


# चासजवळ ऑक्सिजनचा टँकर उलटला; एकाचा दुर्दैवी मृत्यू तर एक जण बचावला



नगर - ऑक्सिजनची वाहतूक करणारा टँकर रस्ता दुभाजकाला धडकून महामार्गावरच उलटल्याने त्याखाली सापडून एकाचा मृत्यू झाला, तर एक जण सुदैवाने बचावला आहे. नगर - पुणे महामार्गावर चास घाटातील उतारावर गुरुवारी (दि.२८) दुपारी २.३० च्या सुमारास ही घटना घडली.

या अपघातात मारुती रामभाऊ कदम (वय ६५) हे मयत झाले असून संदीप बाबाजी अडसरे (दोन्ही रा. पिंप्री जलसेन, ता.पारनेर) हे या अपघातातून सुदैवाने बचावले असून ते जखमी झाले आहेत. मयत कदम व अडसरे हे दोघे चास घाटात कांद्याचे रोप पाहण्यासाठी गेले होते. रोप पाहून ते महामार्गाच्या कडेने आपल्या दुचाकी लावलेल्या ठिकाणी पायी जात असताना त्याच वेळी ऑक्सिजनची वाहतूक करणारा टँकर पुण्याहून नगरच्या दिशेने येत होता. घाटात उताराला चालकाचे टँकर वरील नियंत्रण सुटले, त्यामुळे टँकर रस्ता दुभाजकाला धडकून महामार्गावरच पलटी झाला आणि घसरत घसरत हे दोघे पायी चाललेले होते तिथ पर्यंत अचानक आला. त्या टँकर खाली सापडून कदम हे मयत झाले तर अडसरे हे रस्त्याच्या बाजूच्या खड्ड्यात पडल्याने ते बचावले गेले. अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

घटनेची माहिती मिळताच नगर तालुका पोलिस ठाण्याचे स.पो.नि. प्रल्हाद गिते, पो.हे.कॉ.आबासाहेब झावरे, खंडेराव शिंदे यांच्या सह महामार्ग वाहतूक शाखेच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत रुग्णवाहिका बोलावून जखमी व मयत यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविले. क्रेन बोलावून रस्त्यावर पलटी झालेला टँकर बाजूला काढत वाहतूक सुरळीत केली. या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात टँकर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## गीत रामायणाचे जनक– गदिमा

गदिमांचे भावविश्व स्पर्श, रूप, रंग, रस, गंध इ. संवेदनांनी समृद्ध होतं (व आहे) त्यात माणदेशच्या मातीचा स्पर्श होता.

निसर्गाचं रूप, भक्तीचा रस, लोकगीताचा रंग तर प्रीतीचा व्याकूळ गंधही होता. एकाचवेळी पारंपरिक लोकगीतांचे, स्त्रीगीतांचे, भजनांचे संस्कार त्यात होते. तर त्याचवेळी नव्या कवितेची भावुक तरलता यांचा समन्वय होता.

सहज स्फुरलेल्या त्यांच्या कवितेत 'माउलीच्या दुग्धपरी आले मृगाचे तुषार' ही गीतात्मकता होती तर चित्रपटासाठी खास विणलेल्या 'एकवार पंखावरून फिरो तुझा हात' अशी हळूवार काव्यात्मकताही होती. गीत व काव्य यांची उत्कट एकात्मता हे गदिमांच्या गीतरामायणातील जीवन व चिंतन सर्वश्रुत ओच. पण त्याव्यतिरिक्त त्यांनी जी चित्रपट गीते लिहिली त्यातही चिरंतन मूल्यांची जपणूक करणारे काव्य लिहिले. त्यांच्या भावविश्वात ह्या मूल्यांना अजोड स्थान आहे. विशेष म्हणजे गहन तत्त्वज्ञान व्यक्त करतानाही प्रासादिक शब्दकळेने ती काव्ये सर्वांना अंतर्मुख करतात.

दंतकथा ठरलेल्या ह्या शब्दयोगी काव्यतीर्थाचा काव्याचे, गीतांचे अन्य लेखनाचे पारायण करणे हा रसिकांच्या समृद्धीचा रियाज आहे. (प्रविण दवणे)

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१







महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने सना बेकरी, बेस्ट बेकरी येथे असलेले अतिक्रमण असलेले पक्के बांधकाम हटविले तसेच नामदेव चौक रोडलगतचे फ्लेक्स बोर्डवर कारवाई करत ते जप्त केले. (छाया – बबलू शेख)

# कच्ची, पक्की बांधकामांसह अनधिकृत अतिक्रमणांवर महापालिकेचा 'हातोंडा'

### फ्लेक्स बोर्ड केले जप्त, टपऱ्या, बंद वाहने हटविली, कोठला परिसरात कारवाई



नगर – निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर महापालिकेने शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केली असून, शुक्रवारी (दि. २९) कोठला परिसरातील अनधिकृत अतिक्रमणे हटविण्यात आली. त्याचबरोबर विनापरवानगी उभारण्यात आलेल्या फ्लेक्स बोर्डवर कारवाई करत ते जप्त करण्यात आले आहेत.

महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने मागील तीन दिवसांपासून अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केली असून, माळीवाडा परिसरातील अतिक्रमणे पहिल्या दिवशी हटवत रस्त्यांचा श्वास मोकळा केला. शुक्रवारी (दि. २९) सावेडी प्रभाग समितीचे प्रभाग अधिकारी बबनराव काळे आणि क्षेत्रीय अधिकारी अर्जुन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम राबविण्यात आली. कोठल्यातील सना बेकरी, बेस्ट बेकरी येथे रोडवर आलेले पक्के अतिक्रमण तोडण्यात आले. प्रभाग समितीतील अधिकारी श्री. गोडाळकर, क्षेत्रीय अधिकारी देविदास बिज्ञा यांच्या सूचनेनुसार पथकाने लोखंडी शटर तसेच सिमेंट भिंती, लोखंडी जाळ्या काढून टाकल्या. रस्त्यालगत बंद अवस्थेत असलेली वाहने हटविण्यात आली. अनेक दुकानदार आपल्या दुकानासमोर लोखंडी जाळ्या टाकतात. त्यामुळे रहदारीला अडथळे येतात. त्याचबरोबर लहान मुले, वृद्ध या जाळ्यांना अडखळून पडतात आणि जखमी होतात. त्यामुळे अशा जाळ्याच पथकाने जप्त केल्या आहेत. दुकानांसमोर लोखंडी जाळ्या टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून, प्रसंगी त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

दरम्यान, शहरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत फ्लेक्स बोर्ड लावण्यात येत आहे. मनपाच्या पथकाने नामदेव चौक रोडलगत असलेले अनधिकृत फ्लेक्स काढून घेत साहित्यासह ते जप्त केले आहेत. ही कारवाई यापुढेही नियमित सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने यापूर्वीच स्पष्ट केलेले आहे.

# राज्यातील पराभूत उमेदवारांना प्रति आमदार म्हणून संधी द्यावी

### २८८ मतदार संघामध्ये पराभूत उमेदवारास आम लोकशाहीपाल म्हणून शपथविधी करण्याचा प्रयत्न



नगर – महाराष्ट्रातील २८८ मतदारसंघांमध्ये दोन नंबरची मते मिळवून काही मतांनी पराभूत झालेल्या उमेदवारांना प्रति आमदार म्हणून संधी मिळावी यासाठी लोकशाही संरक्षण कायदा आणण्याचा आग्रह पीपल्स हेल्पलाईन संघटनेने धरला आहे. यासाठी महाराष्ट्रातील समविचारी वकिल प्रयत्नशील आहेत.

महाराष्ट्रातील २८८ मतदार संघामध्ये दोन नंबरला राहिलेल्या सर्वच उमेदवारांची आम लोकशाहीपाल म्हणून त्यांच्या मतदारसंघात जनतेच्या साक्षीने शपथविधी करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. भारतातील संसदीय लोकशाही दिव्यांग लोकशाही असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. कारण पराभूत झालेल्या उमेदवारांना पुढील पाच वर्ष जनतेच्या वतीने काम करण्याची संधी बऱ्याच वेळेला नाकारली जाते. त्यामुळे पराभूत उमेदवाराला मतदान करणारे निराश झालेले लोक अडगळीला पडतात. त्यामुळे माजी मुख्यमंत्री शरद पवार, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात व माजी मंत्री बच्चू कडू यांच्याशी चर्चा करून पराभूत उमेदवारांना प्रति आमदार म्हणून आम लोकशाहीपाल म्हणून काम करण्यासाठीचा प्रस्ताव ठेवला जाणार असल्याचे ॲड. कारभारी गवळी यांनी म्हंटले आहे.

पूर्वी पासूनच भारतीय समाजामध्ये आर्थिक आणि सामाजिक विषमता जोपासली गेली. त्यातून दिव्यांग समाज निर्माण झाला आहे. नुकत्याच झालेल्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत २८८ जागा बाबत मतदार अक्कलमारी मोठ्या प्रमाणात झाली. त्याचबरोबर ईव्हीएम मशीनचा देखील गैरवापर झाला आहे, अशी शंका निर्माण झालेली आहे. त्यामुळे बाळासाहेब थोरात आणि बच्चू कडू यांसारख्या उमद्या लोकांना अनपेक्षित पराभवाला तोंड द्यावे लागले. परंतु जनतेचे प्रश्न पुढील पाच वर्ष सातत्याने सरकार पुढे मांडण्यासाठी आणि त्याच वेळेला निवडून आलेल्या आमदारावर लक्ष ठेवण्यासाठी अशा लोकशाहीपालची अत्यंत गरज असल्याचे संघटनेने भूमिका व्यक्त केली आहे.

आम लोकशाहीपाल कार्यपद्धतीमुळे भारतातील दिव्यांग संसदीय प्रणाली मोडीत निघून कोट्यावधी मतांचा आदर होऊ शकेल. कारण निवडून आलेल्या उमेदवारापेक्षा पराभूत उमेदवाराला फक्त ५ किंवा २५००० मते कमी पडलेली आहे.ज्यांनी मते दिली, परंतु उमेदवार पराभूत झाला अशा मतदारांना पुढील पाच वर्षे आधार देण्यासाठी आणि त्यांची कामे करण्यासाठी आमलोकशाहीपाल उपयुक्त ठरणार आहे. निवडून आलेल्या आमदाराने किंवा त्यांच्या पक्षाने जनतेला दिलेल्या आश्वासनाच्या पूर्ततेसाठीसुद्धा लोकशाहीपाल वचक ठेवण्याचे काम करणार आहे. जनतेची कामं करून आणि सरकारवर दबाव तंत्राचा वापर करण्यासाठी अशा यंत्रणेची फार मोठी गरज असल्याचे म्हंटले आहे. या संकल्पनेला नगर मधील वकीलांनी सक्रिय पाठिंबा जारी केला आहे.

# मंगल कार्यालयातून महिलेच्या पर्सची चोरी

### नवरीच्या दागिन्यांसह सुमारे २ लाख ७५ हजारांचा ऐवज लंपास

नगर – विवाह सोहळ्यात नवरी मुलीला घालण्यासाठी केलेले सोन्याचे साडेतीन तोळ्याचे गंठण व महिलेने तीचेही दागिने ठेवलेली पर्स असा सुमारे २ लाख ७५ हजार रुपयांच्या ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना श्रीगोंदा तालुक्यातील देऊळगाव गलांडे येथे घडली आहे. याप्रकरणी श्रीगोंदा तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संगीता प्रफुल्ल लोंढे (रा.लोंढेमळा, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या मामाच्या मुलाचे लग्न बुधवारी (दि.२७) दुपारी श्रीगोंदा तालुक्यातील देऊळगाव गलांडे येथे शिवशंकर मंगल कार्यालयात होते. त्यानिमित्त त्या देऊळगाव गलांडे येथे गेल्या होत्या. विवाह सोहळ्यात नवरी मुलीला घालण्यासाठी नवरदेव यांच्या कुटुंबाने सोन्या चांदीचे दागिने केलेले होते. ते सांभाळण्यासाठी फिर्यादी लोंढे यांच्याकडे देण्यात आलेले होते.

हळद आणि लग्न एकाच दिवशी असल्याने दुपारी १.२० च्या सुमारास मंगल कार्यालयात हळदीसमारंभ सुरु असताना फिर्यादी या नवरा, नवरीला हळद लावण्यासाठी गेल्या. त्यावेळी त्यांनी नवरीसाठी केलेले दागिने आणि त्यांचेही दागिने ठेवलेली पर्स तेथेच बाजूला ठेवली. काही वेळात अज्ञात चोरट्याने त्यांची नजर चुकवून ती पर्स चोरली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. चोरीची घटना बुधवारी घडली. मात्र लग्न सोहळ्याची गडबड असल्याने सर्व कार्यक्रम उरकल्यावर गुरुवारी (दि.२८) त्यांनी पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक मनोहर खिळदकर हे करीत आहेत.

# गावठी कट्टा लावत शेतकऱ्याचे अपहरण; मागितली वीस लाख रुपयांची 'खंडणी'

### नगरच्या चौघा जणांवर सोनईत गुन्हा दाखल, दोघांना पोलिसांनी केली अटक

नगर – शेतजमिनीच्या व्यवहारातून नेवासा तालुक्यातील चांदा येथील शेतकऱ्याचे अपहरण करण्यात आले. त्या शेतकऱ्याला गावठी कट्टा लावून धमकी देत २० लाखांची खंडणी मागण्यात आली आहे. घोडेगाव चौकात गुरुवारी (दि.२८) सकाळी ११ च्या सुमारास हा प्रकार घडला. याप्रकरणी सोनई पोलिसांनी नगरमधील चौघांवर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत विजय विठ्ठल चौधरी (वय ४८, रा. चांदा, ता. नेवासा) यांनी फिर्याद दिली आहे. चौधरी यांनी कलावती भगवान जावळे यांच्याकडून जमीन खरेदी केली होती. गुरुवारी फिर्यादी चौधरी त्यांच्या एमएच १७ बीएक्स ८१२४ क्रमांकाच्या वाहनात बसलेले असताना जमिनीच्या बाकी असलेल्या पैशाच्या कारणावरून कलावती जावळे यांच्या सांगण्यावरून अक्षय ऊर्फ विजय रमेश साळवे, (वय २०, रा. माधवबाग, भिंगार), राहुल श्रीरंग आढागळे (वय २८, रा. सिव्हिल हॉस्पिटल समोर सिद्धार्थनगर, नगर), आकाश संजय पवार, (रा. ब्रम्हतळे, भिंगार) हे निळ्या रंगाच्या मारुती स्विफ्ट कार मध्ये आले. त्यांनी चौधरी यांना त्यांच्याच कारमध्ये मागील बाजूस बळजबरीने बसवून अपहरण करून घेऊन गेले. त्यांना मारहाण व शिविगाळ करत गावठी पिस्तुलातून गोळ्या घालून जिवे ठार मारण्याची धमकी दिली. कलावती भगवान जावळे यांना देण्यासाठी १५ लाख रुपये व आरोपींच्या तावडीतून सुटण्यासाठी पाच लाख रुपये असे एकूण २० लाख रुपयांची खंडणी मागितल्याचे चौधरी यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

वा प्रकरणीवरील साळवे, आढागळे, पवार या तीन जणांसह कलावती जावळे (हल्ली रा. वांबोरी ता. राहुरी) यांच्यावरही भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४० (३), ३०८ (३)(५), ११५ (२), ३५२, ३५१ (२)(३), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील अक्षय साळवे, राहुल आढागळे या दोन आरोपींना रात्री उशिरा सोनई पोलिसांनी नगर शहरातून ताब्यात घेत अटक केली आहे. अधिक तपास सोनईचे पोलिस उपनिरीक्षक डी. एम. गावडे करत आहेत.

# अनुसूचित जमातीच्या मुलांसाठी मोफत पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण

नगर – अकोले तालुक्यातील मवेशी येथील पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रात जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुलांसाठी चार महिने कालावधीचे पोलीस व सैन्यदल भरतीचे मोफत पूर्व प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले असून यासाठी ५ डिसेंबरपर्यंत ऑफलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन राजुर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले आहे.

अनुसूचित जमातीच्या मुलांना या मोफत भरतीपूर्व प्रशिक्षणात निवास व भोजन सुविधाही दिली जाणार आहे. प्रशिक्षणासाठी अर्ज करण्यासाठी १२ वी उत्तीर्ण गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला, आधारकार्ड, रहिवासी दाखला किंवा शिधापत्रिका, अधिवास प्रमाणपत्र, चार पासपोर्ट आकाराची छायाचित्रे आवश्यक आहेत.

उमेदवाराचे वजन किमान ५० किलोग्रॅम आणि वय १८ ते २५ वर्ष असावे. उंची कमीत कमी १६५ सेंटीमीटर असावी. उमेदवाराची निवड शारीरीक चाचणी (८०० मीटर धावणे) व लेखी परीक्षेद्वारे करण्यात येणार असून यासाठी प्रत्येकी ५० असे एकूण १०० गुण असणार आहेत.

ऑफलाईन अर्ज पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र मवेशी, ता.अकोले, जि.अहिल्यानगर या पत्त्यावर सादर करावेत. अर्ज भरलेल्या पात्र उमेदवारांनी प्रशिक्षण केंद्रात ६ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता कागदपत्रांच्या मूळ व छायाकिंत प्रतीसह उपस्थित रहावे, असे आवाहनही श्रीमती बोकडे यांनी केले आहे.

# अवैध वाळू उत्खनन थांबवून तस्करांवर कारवाई करा अन्यथा नदी पात्रात आंदोलन



नगर – पारनेर तालुक्यातील शिक्री भागातील शासकीय वन विभागाच्या हद्दीत बेसुमार सुरु असलेल्या अवैध वाळू उत्खनन थांबवून स्पॉट पंचनामा करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. सदर प्रकरणी कारवाई न झाल्यास शिक्री, पवळदरा, देवसडे नदी पात्रात स्थानिक नागरिकांसह जनआंदोलन करण्याचा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

पारनेर तालुक्यातील शिक्री, तास, देसवडे या भागातून पारनेर तहसील कार्यालय व पोलीस प्रशासन यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उत्खनन व खुलेआम वाहतूक सुरू आहे. याबाबत अनेक वेळा तक्रारी अर्ज करून देखील कुठलीही कारवाई पोलीस प्रशासन व महसूल विभाग करत नाही. फक्त ज्या वाहनांचे हप्ते वेळेत आले नाही, त्याच वाहनांवर कारवाई केली जाते. काही वाहने पकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक तडजोड करून सोडून दिली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शिक्री, देसवडे या भागात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज राहतो. त्यांच्या जमिनी या भागात आहेत, परंतु वाळू तस्कर दहशत करून आदिवासी समाजावर अन्याय करत आहेत. फॉरेस्ट हद्दीत मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड करून वाळू उत्खनन केले जात आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला असून, प्रशासन बघ्याची भूमिका घेत असल्याचे म्हंटले आहे.

शिक्री, देसवडे भागातील अवैध वाळू उत्खननाचे मोजमाप सार्वजनिक बांधकाम विभाग कडून करण्यात यावे, वाळू तस्करांवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन भारतीय दंड संहिता कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल व्हावा व त्यातील संघटित गुन्हेगारांविरुद्ध मुक्कांतर्गत (एनपीडी) कारवाई पंधरा दिवसात न झाल्यास आंदोलन करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## विमलबाई बुरगुल यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – येथील पाईपलाईन रोडवरील श्रमिकनगर येथे राहणाऱ्या श्रीमती विमलबाई नारायण बुरगुल (वय ६९) यांचे २८ नोव्हेंबर रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर २९ नोव्हेंबर रोजी नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पुरुषोत्तम व श्रीनिवास बुरगुल यांच्या त्या मातोश्री होत.

# राज्यातील साखर उद्योग व जोडधंद्यातील कामगार १६ डिसेंबरपासून संपावर जाणार : बैठकीत निर्णय

नगर – महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ व महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघ यांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची एकत्रित बैठक सांगली येथे झाली असून कामगारांच्या विविध मागण्यासाठी राज्यव्यापी संप १६ डिसेंबर रोजीच्या पहाट पाळी पासुन साखर उद्योग व जोडधंद्यातील कामगार बेमुदत संपावर जाणार असल्याचा इशारा महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, सरचिटणीस शंकरराव भोसले, कोषाध्यक्ष प्रदीप बनगे, कार्याध्यक्ष अविनाश आपटे, राऊसाहेब पाटील, महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघाचे अध्यक्ष क्रॉ. पी. के. मुडे, सरचिटणीस क्रॉमेड आनंदराव वायकर यांच्या उपस्थितीत देण्यात आला.

साखर उद्योग व जोडधंदयातील कामगारांचे वेतन व सेवाशर्ती ठरविणेबाबत शासनाने ताबडतोब त्रिपक्ष कमिटी गठीत करावी, साखर उद्योगातील कामगारांचे थकीत वेतन मिळालेच पाहिजे. साखर उद्योगातील रोजदारी, कंत्राटी, नैमित्तीक व तात्पुरते काम करणाऱ्या कामगारांनाही त्रिपक्षीय समितीच्या कराराप्रमाणे अंमलबजावणी करून वेतनवाढ समान कामाला समान वेतन मिळावे, भाडेतत्वावर व भागीदारीने व विक्री केलेल्या तसेच खाजगी साखर कारखान्यातील कामगारांना त्रिपक्षीय समितीच्या कराराप्रमाणे वेतन मिळाले पाहिजे व त्यांच्या थकीत पगाराची रक्कम अग्रक्रमाने मिळाली पाहिजे, याबाबत स्थानिक संघटनाची मान्यता घेवूनच करार करावा या व इतर १०/२/२०२४ रोजीच्या कामगारांच्या मागण्या मान्य कराव्या, शेतीमहामंडळातील कामगांराचे प्रलंबित प्रश्नाची सोडवणूक करावी. याबाबत दोन्ही राज्यव्यापी संघटनानी शासनास संपाच्या नोटीस दिलेल्या आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### केस गळणे बंद होण्यासाठी

मेथीची पाने वाटून केसांना लावल्यास व मेथ्या अर्धा-अर्धा चमचा सकाळ-सायंकाळ खाल्ल्यास केस गळणे बंद होते. त्याचप्रमाणे लिंबाची फोड डोक्याला चोळल्यास केस गळती थांबते.

## पाककला

### मुरुक्कू

**साहित्य -** चार वाट्या तांदळाचं पीठ, अर्धी वाटी उडदाची डाळ, अर्धी वाटी लोणी, चवीला मीठ, एक चमचा जिरे, अर्धा चमचा भरडलेली काळी मिरी, दोन वाट्या ओलं खोबरं, तळण्यासाठी तेल.

**कृति -** उडदाची डाळ खमंग भाजून घ्यावी आणि मिक्सरवर त्याचं बारीक पीठ करावं. तांदळाचं पीठ, उडदाचं पीठ, लोणी, मीठ, जिरं, मिरी एकत्र करून प्रोसेसरमधून फिरवून घ्यावं. खोबऱ्यात कोमट पाणी घालून त्याचं दूध काढून घ्यावं. हे दूध घालून पीठ भिजवावं. अर्धा तासानं चकल्या कराव्यात.

## सौंदर्य

### त्वचा स्वच्छ होण्यासाठी

✲ लिंबू रस, बेसन, कच्चे दूध प्रत्येकी एक चमचा घेऊन एकत्र मिसळावे. १५ मिनिटे चेहऱ्यावर लावून ठेवून धुवावे. हे उटणे रोज वापरल्यास त्वचेची रोमछिद्रे उघडतात व मुरमे नष्ट होतात.

✲ मसूर डाळ बारीक वाटून दुधात घुसळून घ्यावी आणि चेहऱ्यावर लावावी. १० मिनिटांनी चेहरा धुवून घ्यावा. आठवडाभर हा उपाय सकाळ-संध्याकाळ करावा.

## वास्तू

भिंतीला लागून फ्रिज, मिक्सर ठेवावे. आगदी नैऋत्य कोपऱ्यात ठेवू नये. कारण या यंत्रात बिघाड होण्याचा संभव असतो. पश्चिम भिंतीला अन्न साठवण्याचे डबे असावेत. पूर्व व उत्तर भागात खिडक्या असाव्यात.

## सल्ला

कांदा भूक वाढवतो. दृष्टी सशक्त करतो. त्वचा रोग उष्माघात, घोळणा फुटणे यावर उपयुक्त असतो. तसेच पोटांच्या आजारांवर रामबाण औषधाचे काम करतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. ३० नोव्हेंबर २०२४

**दर्श अमावास्या, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, विशाखा १२।३५, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : मित्र आपणास मदत करतील व काही आवश्यक कार्ये पूर्ण होतील.

**वृषभ** : मोठ्यांचा आधार मिळाल्याने कार्य पूर्ण होतील. वैवाहिक जीवनात स्थिती अनुकूल राहील.

**मिथुन** : व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील. आरोग्य बिघडेल.

**कर्क** : घरात किंवा पैशांमध्ये वाढ झाल्याने आपणास आनंद मिळेल.

**सिंह** : आपला आत्मविश्वास आज वाढेल. धार्मिक कार्ये पूर्ण कराल.

**कन्या** : अधिक श्रम करावे लागतील. व्यावसायिक नुकसान संभवते.

**तुळ** : एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल.

**वृश्चिक** : शत्रू प्रभावहीन पडतील. आजचा दिवस आपल्याला नव्या संधी देईल.

**धनु** : हितशत्रूंवर मात कराल. जुनी रखडलेली कामे आज मार्गी लागणार आहेत.

**मकर** : आजचा दिवस आपल्यासाठी नवीन सुरुवात करण्यास अनुकूल राहिल.

**कुंभ** : मान-सन्मानात वाढ होईल. कौटुंबिक प्रश्नांचे निराकरण होईल. भावांकडून सहकार्य मिळेल.

**मीन** : कामात एकाग्रता राहिल. भाऊबंद डोके वर काढतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**मालक** : (नोकरास) अरे आज एक तास उशीरा आलास ऑफीसला?

**नोकर** : (कण्हत) मालक मी दुसऱ्या मजल्यावरून खाली पडलो.

**मालक** : यात तुला एक तास लागला.

# ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

✲ सर्वात जास्त व सर्वात कमी लोकसंख्या असलेले आफ्रिकेतील देश कोणता? अनुक्रमे - नायजेरिया व सिचालिस

✲ माशांच्या जास्तीत जास्त प्रजाती असलेले आफ्रिकेतील सरोवर कोणते? - मालावी सरोवर

✲ महान रिफ्ट दरी कोठे आहे? - रिफ्ट दरी ही ४८३० किमी लांब सिरीया ते दक्षिण पश्चिम आशिया ते मोझॅम्बीक व दक्षीण पूर्व आफ्रिका या दरम्यान आहे.

✲ लोकसंच्या व क्षेत्रफळाच्या दृष्टीने आफ्रिकेतील सर्वात मोठे शहर कोणते? - कॅरी

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०६० सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | ५ | ६ |
| | ■ | ७ | | ८ | | | |
| ९ | १० | | ■ | | ■ | | ■ |
| ■ | | ■ | ११ | | | ■ | १२ |
| १३ | | ■ | १४ | | ■ | १५ | |
| | ■ | १६ | | ■ | १७ | | ■ |
| १८ | | | ■ | १९ | | | |
| | ■ | २० | | | | ■ | ■ |

**आडवे शब्द :-** १) भारतातील एक घटक राज्य ४) माशासारखे डोळे असलेली ७) माणूस आणि देव; अर्जुन आणि श्रीकृष्ण ९) पक्का बांधलेला रस्ता ११) निरोप; सांगावा १३) मालदीवची राजधानी १४) भगवान; ईश्वर १५) भीती; डर १६) शरीर; काया; कुडी; तन १७) बुंदी वगैरे पाडण्याचे सछिद्र असे एक पात्र १८) पाणी अडविण्यासाठी नदी वगैरे पात्रात आडवी बांधतात ती भिंत १९) भोजनातील एक घटक २०) गीत लिहिणारा किंवा रचणारा

**उभे शब्द :-** १) सुकुमार असून सुंदर २) थांबण्याचे ठिकाण; स्टँड ३) कोणत्याही प्राण्यातील पुरुष जात ४) एक कृष्णभक्त हिंदी महिला संत ५) नाटक किंवा चित्रपटातील मुख्य नट ६) रोडका; कृश; दुर्बळ ८) एक मराठी संत १०) आयते व अचानक मिळालेले धन; घबाड ११) शंका; संशय १२) सुविधा १३) केवळ मान म्हणून दिला जाणारा मोबदला १५) खाच बुजविण्यासाठी आत टाकलेली भर १६) खुष होऊन दिलेली वस्तू; डोनेशन १७) छताच्या काठास लावतात त्या रंगीबेरंगी कापडाच्या नक्षीदार चुण्या १९) वडिलांचा भाऊ; चुलता

### शब्दगंध क्र. ७०५९ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | दा | शि | व | ■ | ग | णि | त |
| वा | ■ | वा | र | क | री | ■ | ह |
| ल | डु | जी | ■ | स | व | ब | ■ |
| ■ | ■ | म | ग | र | ■ | ग | त |
| आ | ■ | हा | ल | ■ | च | ल | न |
| ग | ज | रा | ■ | द | हा | ■ | म |
| म | ग | ज | ■ | बा | ■ | वा | णी |
| न | त | ■ | स | व | ल | त | ■ |

### फिल्मीचक्कर क्र. ११६५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | धु | म | ती | ■ | म | त | ■ |
| नो | ■ | स्ता | ■ | द | स्त | क | ■ |
| ज | मा | ना | ■ | म | ■ | ■ | चो |
| कु | ली | ■ | ■ | त | डी | पा | र |
| मा | ■ | ना | य | क | ■ | र | ■ |
| र | वि | ना | ■ | ■ | ■ | स | |
| ■ | ज | ■ | स | र | ग | म | ■ |
| ज | य | ■ | ■ | जा | ■ | णी | ■ |

# ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲ मुलांचे विश्व ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : बुद्धी नसणारे लोक शिंगाशिवाय असणाऱ्या पशूप्रमाणे असतात. **- प्रेमचंद.**

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## कम्पोस्ट म्हणजे काय?

कम्पोस्टींगबद्दल तुम्हीवाचले असेल. केरकचरा मलमूत्र यांची एकत्रितपणे विल्हेवाट लावण्याची ही एक पद्धत आहे. ही एक नैसर्गिक क्रिया आहे. यात जिवाणूंच्या मदतीने सेंद्रिय पदार्थांचे विघटन होते व अखेर खतासारखा पदार्थ ''कम्पोस्ट'' तयार होतो. या प्रक्रियेत कार्बनडायऑक्साईड, पाणी तसेच उष्णता निर्माण होते. कम्पोस्टींगमध्ये उष्णता निर्माण होत असल्याने माशांची अंडी व अळ्या नष्ट होतात. तणाच्या बिया व रोगकारक जंतू मरतात. या प्रक्रियेत तयार होणारे कम्पोस्ट जमिनीला चांगल्या प्रकारे धरून ठेवते. त्यात जमिनीसाठीची नायट्रेट व फॉस्फेट ही पोषक द्रव्येही असतात. कम्पोस्टींगसाठी ३ फूट खोल, ५ ते ८ फूट रुंद व १५ ते ३० फूट लांबीचे चर खणतात. सुरवातीला या चरात केरकचऱ्याचा ६ इंची थर टाकतात. त्यावर मलमूत्राचा २ इंची थर टाकतात. अशा प्रकारे एका आड एक केरकचरा व मलमूत्र यांचे थर टाकले जातात.

जेव्हा जमिनीपासून हे थर १ फूट उंचीपर्यंत येतात तेव्हा त्यावर ९ इंच जाडीचा मातीचा थर टाकला जातो. मातीचा थर व्यवस्थित टाकल्यास त्यात आपला पाय रुतणार नाही. हे थर टाकल्यानंतर ७ दिवसातच जिवाणूंच्या प्रक्रियेमुळे उष्णता निर्माण होते. ही उष्णता २ ते ३ आठवडे टिकते.

त्यामुळे मलमूत्र व केरकचऱ्यातील सेंद्रिय पदार्थांचे विघटन होते. ४ ते ६ महिन्यात विघटन पूर्ण होऊन गंधहीन असे कंम्पोस्ट खत तयार होते. १,००,००० हून कमी लोकसंख्या असलेल्या नगरपालिकांनी मलमूत्र व केरकचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी कम्पोस्टींगसाठी वापर करावा. काही ठिकाणी कम्पोस्टींग यांत्रिक रितीने केले जाते. असे हे निसर्गाशी मैत्री साधणारे कम्पोस्टिंग, घाणीची यामुळे विल्हेवाट आरोग्यपूर्ण पद्धतीने लागतेच; पण ज्वलनामुळे होणारे हवेच व जंतुंमुळे होणारे माती, पाण्याचे प्रदुषणही टाळता येते.

## अंतर्ज्ञान

दोघे मित्र एका गणपतीच्या देवळात दर्शनासाठी आले होते. देवळाच्या गाभाऱ्यात एक आंधळा बसला होता. ते पाहून रमेश गोविंदाला म्हणाला, ''या बाजूला बसलेल्या त्या व्यक्तिला पाहिलस का? तो आंधळा आहे पण गावातील विद्वान पंडित आहे.

रमेशचे म्हणणे गोविंदाला पटेना. शेवटी गोविंदा त्या आंधळ्याजवळ गेला. त्याला आपली ओळख सांगून गोविंदा त्याच्याशी गप्पा मारू लागला. गप्पा मारता मारता तो जन्मापासून आंधळा आहे हे गोविंदाच्या लक्षात आले. पण तो पंडित आहे यावर त्याचा विश्वास बसेना. म्हणून गोविंदने त्याला विचारले, 'या देवळाच्या गाभाऱ्यात आपण रोज कुणाचं चिंतन करता? आपल्या अभ्यासाचा नक्की विषय कोणता आहे? यावर तो आंधळा म्हणाला,

''मी खगोलशास्त्राचा अभ्यासक आहे. हे त्याचे उत्तर गोविंदाला पटेना, ''तुम्हाला अजिबात दिसत नाही मग तुम्ही ग्रह ताऱ्यांचे निरीक्षण कसं करता? या त्याच्या संशयाने विचारलेल्या प्रश्नावर आंधळा स्वतःच्या छातीवर हात ठेवून म्हणाला, अरे, याच्या आतील सर्व ग्रह ताऱ्यांचे मी निरीक्षण आणि अभ्यास करत असतो. आता तरी कळलं का? **तात्पर्य** : बाह्य ज्ञानापेक्षा अंतर्ज्ञान जाणून घेण्यातच विद्वत्ता आहे.



# रहमते दर्शन (भाग - १)

संत दर्शनसिंह जी महाराज ३० मई १९८९ को महासमाधि में लीन हो गये, इसके साथ ही एक ऐसे युग का अंत हो गया जो प्रेम, एकता व शांति का प्रतीक बन चुका था। संत दर्शनसिंह जी ने आज विश्व को जो सबसे बड़ा योगदान दिया है, वह है 'सकारात्मक अध्यात्म' का रास्ता। उन्होंने ख़ुद अपनी दुनियावी ज़िम्मेदारियों को निभाया और उनको पूरा करते हुए आध्यात्मिक प्रचार-प्रसार में भी अपना समय लगाया। सरकारी नौकरी में अपनी ज़िम्मेदारी पूरी तरह निभाते हुए, वे १९८९ में भारत सरकार के डिप्टी सेक्रेटरी के पद से सेवानिवृत्त हुए।

संत कृपालसिंह जी महाराज ने संत दर्शनसिंह जी को अपना उत्तराधिकारी घोषित किया था। संत दर्शनसिंह जी महाराज ने 'सावन कृपाल रूहानी मिशन' की १९७४ में स्थापना की और १९८९ तक मिशन के ५०० केंद्र पूरे विश्व में थे और उनका साहित्य ५० भाषाओं में उपलब्ध था। पर संत दर्शनसिंह जी के मिशन को न तो इन नम्बरों से, न ही उनके द्वारा नामदान का

### प्रस्तावना

वरदान पाने वालों से जाना जा सकता है। उनकी बादशाहत तो दिलों की बादशाहत थी। उन्होंने हम सब के दिलों में, हमारी ज़िन्दगी में बदलाव लाकर उन पर बादशाहत की। वह एक शायर, एक पूर्णपुरुष, एक परफेक्ट संतान, एक परफेक्ट पिता, व संगत के महान रक्षक थे। उन्हीं के शब्दों में,

नाम है आदमी तो क्या, अस्ल में रूहे इश्क़ हूँ
सारी ज़मीं है मेरा घर, सारा जहाँ मेरा वतन
- मताए-नूर (उर्दू ग़ज़ल-२)

संत राजिन्दर सिंह जी महाराज के आदेशानुसार सभी बहन-भाइयों को कहा गया कि वो महाराज जी के सम्मान में अपने-अपने संस्मरणात्मक लेख भेजें। इसकी प्रतिक्रिया ऐसी ज़बरदस्त हुई कि हमारे पास इतने लेख आ गये कि उनको एक ही संस्करण में छापना एक समस्या हो गई। मुझे आशा है कि लेखों के छटनी कर संक्षेप में छापने की मेरी मजबूरी के लिए मेरे भाई-बहन मुझे क्षमा करेंगे। अभी बहुत से संस्मरण बाकी है जिनको हम भाग २ या फिर भाग ३ में छापेंगे। इस संस्करण को छापने जैसे अद्भुत कार्य, जिसकी बहुत ज़रूरत थी, सब के सम्मिलित प्रयास का फल है।

जहाँ यह सब करने की प्रेरणा संत राजिन्दरसिंह जी महाराज ने दी है, मैं उन भाई-बहनों का ऋणी हूँ जिन्होंने हमारे निमंत्रण का प्रत्युत्तर अपने लेख भेज कर दिया और भाई प्रेम प्रकाश गोयल के प्रति विशेष रूप से आभारी हूँ जिन्होंने सब भाई-बहनों से सम्पर्क किया, लेख इकट्ठे किये व सम्पादन कार्य किया। डॉ. दिनेश गुप्ता जी और श्री आई. आर. मलिक का भी योगदान इस पुस्तक के संकलन में बहुत है और उसके बिना शायद यह पुस्तक अभी आप के पास नहीं पहुँचती। इस पुस्तक में अनेक लेख हैं और सभी लेखकों को अपने-अपने अनुभव हुए, पर स्वयं संत दर्शनसिंह जी महाराज के शब्दों में, तमाम ज़िन्दगी-ए-आरज़ू का हासिल थी

वुह एक शब जो तेरी बज़्म में गुज़ार आये

जो भाई बहन अपने लेख हम तक नहीं पहुँचा पाये हैं, उनसे मेरा अनुरोध है कि जल्दी से जल्दी अपने अनुभव हम तक भेज दें ताकि इस पुस्तक के अगले भाग में हम उनको शामिल कर सकें।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

### अंतरीक बल

याद रखो आग से गुजर कर सोना कुन्दन बनता है। दबाव से गुजर कर कोयला हीरा बनता है। कीचड़ से गुजर कर कोई फूल कमल बनता है। आग, दबाव, कीचड़ कुछ भी खराब नहीं, कुछ भी निरर्थक नहीं। नींव में लगी ईंटें दिखती नहीं। माला में छिपा धागा नहीं दिखता। इस का यह अर्थ नहीं की उसका कोई अर्थ ही नहीं। वह उपयोगी नहीं। इस धरती पर हर चीज का उपयोग है। सब कुछ काम का है, खराब कुछ भी नहीं।

हमें सब के प्रति खुला रहना चाहिए। किसी के खिलाफ व विपरीत नहीं जाना चाहिए। जितना जरूरी पैसा है उतना ही जरूरी राजयोग है। जितनी अहम भूमिका तन की है उतनी ही अहम भूमिका मन की है। रोजगार हो या विवाह, हिन्दी हो या अंग्रेजी सब कुछ जरूरी है और काम का है। हम हमेशा सामने वालो को अपने जैसा मानते हैं। पांचो उंगलिया बराबर नहीं होती, ऐसे ही हर इन्सान का स्वभाव भी एक जैसा नहीं होता। जब हम किसी के साथ अच्छा करते हैं तो जरूरी नहीं कि हमारे साथ वह भी अच्छा करेगा। जब हमारे साथ बुरा होता है तो हम किस्मत को कोसते हैं या फिर अपनी शराफत को। नतीजा यह निकाल लेते हैं कि हमें भी किसी की मदद नहीं करनी चाहिए। कोई हमें इज्जत देता है, नहीं देता है, यह उसका स्वभाव है। हमें अपने लक्ष्य अनुसार काम में लगे रहना है। जो भी तुम्हारे पर वर्तमान में दबाव है, दबाव के रूप में कोई व्यक्ति है, आर्थिक स्थिति है, कोई संबन्ध है या कोई रोग है। हालात ऐसे हैं कि आप को वहीं रहना है। ऐसी स्थिति में अपना मन अच्छे व्यक्तियों में, अच्छे सम्बन्धों में लगाए रखें। जो दबाव है उस पर ब्रुक्स पढ़ो। बाबा को याद करते रहो। ये दबाव और कुछ नहीं हमें शिक्षा देते हैं, जबरदस्ती हमें अवलम्बन्द बनाते हैं। इन से एक सीख मिलती है आप से जो छोटे हैं आप पर जो निर्भर हैं उन्हें दबाव दे कर जलील न करें। ऐसा सोचने से आप का समय व्यर्थ काम में लगेगा नहीं तो समय नष्ट होगा। ऐसे आप भी सभी संकटों से बच सकते हैं अगर समय से पहले सोचने की आदत डाल लें। समय प्रबन्धन और दबाव से मुक्ति काश यह एक हद के बाद न तो हम दूसरे को बदल सकते हैं और न स्वयं को दूसरे के अनुसार ढाल सकते हैं। दुसरा हमेशा हमें किसी न किसी रूप में कष्ट देता है। कभी हम से अधिक अच्छा बन कर तो कभी हम से अधिक बुरा बन कर। इस बात को स्वीकर कर लेना चाहिए कि हर कोई हमारे जैसा नहीं होगा, सब भिन्न भिन्न होंगे। जिस दिन हमारा यह दृष्टिकोण बन जाएगा, उस दिन से हम काफी अर्थों में कम दुखी होने लगेंगे। जिन लोगों से हम घिरे रहते हैं, उनका प्रभाव हमारे दृष्टिकोण पर पड़ता है। तभी कहते हैं जैसी संगत वैसी रंगत। संगत हमारे जीवन के दृष्टिकोण का आधार है। जीवन अच्छा रखना है तो दृष्टिकोण अच्छा रखना होगा। दृष्टिकोण अच्छा तभी रहेगा जब सब तरफ से हमारी संगत अच्छी होगी। हम हमेशा सोचते नहीं हुआ होता तो वैसा होता या वैसा हुआ होता तो ज्यादा अच्छा होता। ऐसी सोच से मूल्यवान समय नष्ट होता है। साकारात्मक कार्यों के पीछे पड़े रहो जब तक वह पूरे नहीं हो जाते। जो आप के बस में है वही करो, बाकी छोड़ दो। इस संसार में सभी जीव जंतु, मनुष्य या रिश्ते आपस में एक दूसरे से जुड़े हुए हैं। ये जो हम सोच लेते हैं। इस चीज का कोई फायदा नहीं, उस चीज का है। ये चीज मेरे लिये नहीं है। दूसरा है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### गर्भसंस्कार स्तोत्र व मंत्रोपचार

यानंतर, शांतीमंत्र म्हणावा.

**ॐ सह नाववतु। सह नौ भुनक्तु। सहवीर्य करवावहै। तेजस्विनावधीतमस्तु। मा विद्विषावहै।**

**ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।**

हे ईश्वरा! माझे व माझ्या बाळाचे रक्षण कर! आम्हा सर्वांचे जीवन सुखमय व आनंदीमय होवो। आम्हा सर्वांचे श्रम हे सत् मार्गाने राहो! आम्हा सर्वांचे ज्ञान अतिउज्वल होवो! आम्ही द्वेषमुक्त होवो! सर्वत्र शांती असू दे!

**ॐ असतो मा सद्गमय, तमसो मा ज्योतिर्गमय। मृत्योर्माऽमृतंगमय। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।।**

हे ईश्वरा! आम्हास असत्याकडून सत्याकडे ने! अज्ञानाच्या अंधकारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे ने! विनाशाकडून अमरत्वाकडे ने हे ईश्वरा, सर्वत्र शांती असू दे!

**ॐ ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्। ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना।।**

**ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।।**

हे ईश्वरा! जीवन यज्ञ आहे! आम्ही सर्व कर्माची ब्रह्माग्नीमध्ये आहुती देतो। आम्ही आमचे सर्वस्व तुला अर्पण करतो। त्याचा स्वीकार होवो. हे ईश्वरा! सर्वत्र शांती असू दे.

ॐ नमः शिवाय। ॐ नमः शिवाय।। ॐ नमः शिवाय ।।

**ॐ कार व ध्यानसाधना :** सृष्टी निर्मितीच्या वेळेचा पहिला ध्वनी म्हणजे 'ॐकार' अ, ऊ, म म्हणजे ब्रह्मा, विष्णू, महेश यांचे प्रतीक, गर्भवतीच्या श्वसनाची क्षमता वाढविणे, गर्भाला ऑक्सिजनचा म्हणजेच प्राणवायूचा पुरवठा करणे, दुषित वायू म्हणजेच कार्बन-डायऑक्साइड बाहेर सोडणे. गर्भवतीचे मन एकाग्र होऊन ध्यान अवस्थेत जाणे. ही सर्व कार्य ॐकारने होतातच; परंतु त्याच बरोबर आपण परमेश्वराचे चिंतन देखील करतो.

**चौथ्या महिन्यामध्ये गर्भस्थ बाळाची पंचेंद्रिय** - श्रोत, त्वक, चक्षु, रसना, घ्राण विकसित होत असतात. म्हणूनच या इंद्रियांचा विकास चांगला होण्यासाठी; बाळाच्या बुद्धीची वाढ उत्तम होण्यासाठी तसेच सकारात्मक विचार बाळापर्यंत पोहोचवण्यासाठी बाळाशी सुसंवाद करणे गरजेचे असते. गर्भस्थ बाळाशी सुसंवाद साधण्यासाठी घरामध्ये प्रसन्न, शांत व पवित्र वातावरण असणे गरजेचे असते. तसेच बाळाशी संवाद साधताना भावी वडिलांची सुध्दा गरज असते म्हणून शक्यतो सकाळच्या वेळी बाळाशी सुसंवाद साधावा. संवाद साधण्यापूर्वी मन एकाग्र होण्यासाठी टि. व्ही., मोबाईल, फोन, टेप, रेडिओ बंद करावेत. ज्याप्रमाणे एखाद्या प्रिय आप्तजनांशी आपण फोनवर मनापासून बोलतो, फोनवर संवाद साधताना समोरील व्यक्ती आपणास दिसत नाही, तरीसुध्दा मनापासून, शांत चित्ताने त्यांच्याशी संवाद साधत असतो. याच पद्धतीने आपण गर्भस्थ बाळाशी मन एकाग्र करून सुसंवाद साधावा.

सुरुवातीला दोन वेळेला दीर्घश्वसन करावे, त्यानंतर तीन वेळा ॐ कार करावा. ज्या स्थितीमध्ये आरामदायक वाटेल त्या स्थितीत बसावे; बसायला त्रास होत असेल, तर पाठीला उशीचा आधार घेऊन बसावे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होण्यासाठी युवा सेनेतर्फे सद्गुरू मच्छिंद्रनाथ व कानिफनाथ महाराजांना युवा सेनेतर्फे आरतीद्वारे साकडे घालताना श्री क्षेत्र मायंबा (सावरगाव) येथील महेश लोंढे आदी कार्यकर्ते.

# एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होण्यासाठी युवा सेनेची आरती

## सद्गुरू मच्छिंद्रनाथ महाराज व कानिफनाथ महाराजांना साकडे

नगर – युवा सेनेच्या वतीने एकनाथ शिंदे पुन्हा राज्याचे मुख्यमंत्री होण्यासाठी श्री क्षेत्र मायंबा (सावरगाव) येथील चैतन्य सद्गुरू मच्छिंद्रनाथ महाराज व मढी येथील चैतन्य सद्गुरू कानिफनाथ महाराज यांची आरती करुन साकडे घालण्यात आले. यावेळी युवा सेनेचे शहर प्रमुख महेश लोंढे, ऋषिकेश चिंधाडे, कमलेश नरसाळे, माजी सरपंच भगवान मरकड, प्रदीप पाखरे, आकाश मरकड, फिरोज शेख आदी उपस्थित होते.

महेश लोंढे म्हणाले की, राज्यात पुन्हा महायुती सरकारची सत्ता येण्यासाठी शिवसेनेने देखील महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मुख्यमंत्रीपदी पुन्हा एकनाथ शिंदे असवी, या भावनेने सर्व शिवसैनिकांनी काम केले. राज्यात मुख्यमंत्री शिंदे यांनी अनेक कल्याणकारी योजना राबवून आदर्श राज्याची प्रचिती जनेतेला करुन दिली.

लाडकी बहीण, शेतकऱ्यांच्या व आरोग्या विविध योजनांचा लाभ जनसामान्यांना मिळवून दिला. त्यांना पुन्हा मुख्यमंत्री पदाची संधी मिळाल्यास आनखी कल्याणकारी योजनांना गती मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# माणुसकीच्या सेवा कार्यात सहभागी होण्यासाठी भाग्य लाभते

## डॉ. वसंत कटारिया यांचे प्रतिपादन; आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये बालकांची मोफत आरोग्य तपासणी



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये बालकांच्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना डॉ. वसंत कटारिया व बाबालाल कटारिया. समवेत इतर डॉक्टर्स, संतोष बोथरा आदी.

नगर – आर्थिक दुर्बल घटकांना आरोग्यसेवा देण्याचे कार्य आनंदऋषीजी हॉस्पिटल करत आहे. उत्तमप्रकारे आरोग्य सेवा देऊन या आरोग्य मंदिरात माणुसकीचे कार्य घडत आहे. नफा नसला तरी चालेल, मात्र सर्वांचे आरोग्य जपण्याचे कार्य या हॉस्पिटलच्या माध्यमातून सुरु आहे. हृदयासंबंधी हजारो शस्त्रक्रिया यशस्वी पूर्ण करण्यात आल्या. या सेवा कार्यातून समाजात मोठा मान–सन्मान मिळाला. तर या सेवा कार्यात माझी मुले देखील जोडली गेली. माणुसकीच्या सेवा कार्यात सहभागी होण्यासाठी भाग्य लाभत असल्याचे प्रतिपादन डॉ. वसंत कटारिया यांनी केले.

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये कटारिया परिवाराच्या वतीने आयोजित बालरोग मोफत तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. कटारिया बोलत होते. याप्रसंगी बाबालाल कटारिया, संजय कटारिया, ॲड. संतोष गुगळे, सुरेश गुगळे, लताताई कटारिया, डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. प्रतीक कटारिया, हर्षदा कटारिया, प्रज्ञा कटारिया, डॉ. श्रेयस सुरपुरे, डॉ. रुपेश सिकची, डॉ. सोनाली कणसे, डॉ. वैभवी वंजारे, डॉ. कोमल लड्डा, संतोष बोथरा, निखिलेंद्र लोढा, सतीश लोढा, अभय गुगळे, माणकचंद कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटल सुरू झाल्यानंतर अद्यावत इन्फ्रास्ट्रक्चर नसताना देखील डॉ. वसंत कटारिया यांच्या मार्गदर्शनाखाली हजारोंच्या संख्येने शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या. आज जागतिक दर्जाच्या अद्यावत सुविधा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध झाल्या असून, मोठ्या प्रमाणात हृदयासंबंधी तसेच ६ हजार बालकांचे वॉल रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया यशस्वी झालेल्या आहेत. हॉस्पिटलच्या स्थापनेपासूनच कटारिया व गुगळे परिवाराचे मोठे योगदान राहिले आहे. वर्धमान महावीर युनिव्हर्सिटीसाठी गुगळे परिवाराचे आर्थिक सहकार्य मिळाले, तर त्यांनी नाममात्र दरात जागा उपलब्ध करून दिली. २५ एकर मध्ये शैक्षणिक संकुल उभे राहत आहे. सामाजिक कार्यात कटारिया व गुगळे परिवाराचे मोठे योगदान मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

ॲड. संतोष गुगळे यांनी मोठ्या शहराच्या धर्तीवर शहरातील बालकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होण्यासाठी सुसज्ज बालकांचे एनआयसीयू सेंटर व नागरिकांना मिळणाऱ्या दर्जेदार आरोग्य सेवेचे कौतुक केले. बालरोग विभागात जन्मल्यापासून ते सर्व बालकांच्या आरोग्याच्या सेवा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत. तर बालकांवरील विविध अवघड शस्त्रक्रिया देखील यशस्वी केल्या जात असल्याची माहिती हॉस्पिटलच्या वतीने देण्यात आली.

शिबिरात ११० बालकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. दर शनिवारी मोफत ओपीडी सेवा दिली जात असून, दर महिन्याला होणाऱ्या बालरोग तपासणी शिबिराचे आयोजन केले जाते. याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

# गाडीलकर हायस्कूल आणि सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालयात माजी अध्यक्ष कै. केरुजी शिंदे व महात्मा फुले यांची जयंती साजरी

नगर – महात्मा फुले एजुकेशन सोसायटीच्या केशवराव गाडीलकर हायस्कूल आणि सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची १३४ वी पुण्यतिथी आणि संस्थेचे माजी अध्यक्ष कै. केरुजी मामा शिंदे यांची जयंती साजरी करण्यात आली. महात्मा ज्योतिबा फुले व केरूजी शिंदे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

महात्मा फुलेंचे स्त्रिशिक्षणाविषयी विचार, त्यांनी समाजासाठी घातक रूढी, परंपरा तसेच त्यांच्या सामाजिक कार्याविषयी विद्यार्थ्यांनी भाषणातून सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोका आर्टच्या संचालिका सौ. हर्षदा अशोक डोळसे होत्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष वसंतराव बेलेकर, संस्थेचे सचिव नामदेवराव गाडीलकर, सहसचिव अनिल शिंदे, संचालक मधुकर शिंदे प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका लतिका काळे, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गायकवाड, विविध शाळेतून आलेले शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.



केशवराव गाडीलकर हायस्कूल आणि सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष अध्यक्ष कै. केरुजी शिंदे व ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांना अभिवादन करताना उपाध्यक्ष वसंतराव बेलेकर आदी.

संस्थेचे सचिव नामदेवराव गाडीलकर यांनी संस्थेच्या प्रगती विषयी व विद्यालयात राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमाविषयी सर्व विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना माहिती दिली. प्रत्येक वर्षी विद्यालयात निबंध, वकृत्व ,कथाकथन अशा आंतर शालेय स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षी दुसरी ते चौथीसाठी भेटकार्ड बनविणे, पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्तमानपत्रा पासून विविध वस्तू बनविणे, तसेच आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू बनविणे या स्पर्धा घेण्यात आल्या. परीक्षक म्हणून बजरंग विद्यालयाचे कलाशिक्षक प्रमोद उबाळे, रूच्या मॅडम, हर्षदा डोळसे, खडू शिल्पकार अशोक डोळसे, संजय गायकवाड सर हे उपस्थित होते.

नगर शहरातून २३ शाळेमधून १५० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी केलेले वस्तू याचे स्पर्धेनंतर प्रदर्शन भरवण्यात आले.

हे प्रदर्शन इतर शाळेतील विद्यार्थ्यांना पाहण्यासाठी खुले आहे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री देशपांडे यांनी केले तर आभार संगीता बोराटे यांनी मानले.



पेमराज सारडा महाविद्यालयात महात्मा फुले पुण्यतिथी व संत ज्ञानेश्वर महाराज समाधी दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमांना अभिवादन करताना प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित. समवेत प्राध्यापक व कर्मचारी.

# सारडा महाविद्यालयात महात्मा फुले पुण्यतिथी व संत ज्ञानेश्वर महाराज समाधी दिन साजरा

नगर – पेमराज सारडा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. तसेच विश्वाचे पसायदान मागणाऱ्या संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

यावेळी उपप्राचार्य प्रा. मिलिंद देशपांडे, प्रबंधक अशोक असेरी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. मंगल भोसले, पर्यवेक्षक डॉ. राजू रिक्कल, डॉ. सुजित कुमावत, प्रा. गिरीश पाखरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. कृष्णा पाटील, प्रा. शैलेश देशमुख, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. किरणकुमार साळवे व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक हजर होते. यावेळी प्राचार्या डॉ.माहेश्वरी गावित यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांचे आध्यात्मिक कार्य व महात्मा ज्योतिबा फुले यांचे समाज सुधारक कार्याची सांगड घालून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



फकिरवाडा (मुकुंदनगर) येथील यशवंतराव गाडे शिक्षण संस्थेत आनंद मेळाव्याचे उदघाटन करताना उद्योजक अमोल गाडे, संचालक रामचंद्र दिघे आदी.

# यशवंतराव गाडे संस्थेत बालआनंद मेळावा साजरा

नगर – फकीरवाडा (मुकुंदनगर) येथील यशवंतराव गाडे शिक्षण संस्थेच्या यशवंत माध्यमिक विद्यालय व श्री गणेश बालक मंदिरामध्ये आज बालआनंद मेळाव्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते.

उद्योजक अमोल गाडे यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ विश्वस्त रामचंद्र दिघे होते. कार्यक्रमास पालक संघाचे आबिद शेख व इतर पालक मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

आनंदमेळाव्यात मुलांनी विविध खाद्यपदार्थांचे, फळांचे, भाज्यांचे स्टॉल, जनरल स्टोअर, चॅट, चायनीज स्टॉल उभारले होते. तसेच काही मनोरंजनात्मक खेळांचाही समावेश होता. उद्योजक अमोल गाडे यांनी आनंद मेळाव्यातुन व्यावहारिक ज्ञान आत्मसात करण्याचा सल्ला मुलांना दिला.

स्वागत प्राथमिकच्या मुख्याध्यापिका अंजली निक्रड यांनी तर प्रास्तावीक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संगिता बनकर यांनी केले. सुत्रसंचालन योगेश गुंड यांनी तर आभार मनिषा मगर यांनी मानले.

# संविधानामुळे एकतेचा संदेश दिला गेला

## डॉ. श्याम पंगा यांचे प्रतिपादन; डॉ. पाऊलबुद्धे फार्मसी कॉलेजमध्ये संविधान दिन साजरा

नगर – आपल्या संपूर्ण भारत देशाच्या भूमीला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्यघटनेमुळे सर्वांना समान हक्क मिळाला. या घटनेला ७५ वर्षे पूर्ण झाली. या राज्यघटनेनुसार आपण समाजामध्ये काम करत आहोत. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. संविधानामुळे एकतेचा संदेश दिला जातो असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. श्याम पंगा यांनी केले.



वसंत टेकडी येथील डॉ. पाऊलबुधे फार्मसी कॉलेज मध्ये संविधान दिनानिमित्त सामूहिक वाचन करून संविधान जपणूक करण्याचा संकल्प करण्यात आला (छाया–विजय मते)

अहिल्यानगर येथील वसंतटेकडी जवळील डॉ.ना. ज.पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये संविधान दिवस साजरा झाला. भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त संविधान अमृत महोत्सवा अंतर्गत निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. भारतीय संविधानातील मानवी मूल्ये या विषयावर संस्था अंतर्गत सर्व कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. यामध्ये नारायणडोह येथील डॉ.ना. ज. पाऊलबुद्धे पॉलिटेक्निक कॉलेज, डी.फार्मसी, बी. फार्मसी, रात्र महाविद्यालय, बीएड कॉलेज, डी.एड कॉलेज, महिला कॉलेज अशा सर्व कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी प्रतिसाद नोंदविला. या कार्यक्रमाचे औचित्य साधत सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल सहसचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, डायरेक्टर साईं पाऊलबुद्धे, सदस्य डॉ. श्रद्धा पाऊलबुद्धे, रघुनाथ कारमपुरी, पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब बोर्डे, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अंबादास शिंदे, माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य भरत बिडवे उपस्थित होते. यावेळी रामकिसन देशमुख यांनी देशाच्या संविधानाच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सर्वात मोठा वाटा होता असे सांगून संविधान दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधानाचे वाचन करून जपणूक करण्यासाठी सर्वांनी सामुहिक संकल्प केला.

ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य अंबादास शिंदे म्हणाले संविधानाची जनजागृती करण्यासाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी हा संविधान दिन देशभरात साजरा केला जातो त्यामुळेच सर्व जाती धर्मातील लोक गुण्या गोविंदाने नांदत आहे. प्राचार्य डॉ.पंगा यांनी संविधान दिनाचा इतिहास समजावून सांगत नवीन पिढीला प्रेरणा दिली आपली मूलभूत कर्तव्य आणि देशाचे कायदे आयुष्यभर पाळण्यासंबंधी संविधानाचे उद्देश सांगितला.

याप्रसंगी घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक डी. फार्मसीची शेख मेहेक, द्वितीय क्रमांक पॉलिटेक्निक कॉलेजची ज्ञानदा दळवी, तृतीय क्रमांक क्षीरसागर प्रतीक्षा बी. फार्मसी आणि बी.एड कॉलेजचे काश्वी जंगले यांना देण्यात आले. कार्यक्रमास बीएड कॉलेजच्या प्राचार्या डॉ.रेखा राणीखुराणा, डीएडच्या प्राचार्या सविता सानप डी फार्मसीच्या प्राचार्या अनुराधा चव्हाण, डॉ. वेणू कोला, प्राचार्या डॉ. सुचित्रा डावरे, संदिप कांबळे, डॉ. प्राची मचे, सुवर्णा येमुल, सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


सुत्रसंचलन डॉ. रोशनी सूर्यवंशी यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रद्धा मुंदडा यांनी केले.

# मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक : डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचा आज स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले होते.

मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ नागनाथ कोतापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बी ए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी एच डी मिळवली.

१९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते.



डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सर आपल्यातून निघून गेले. त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



नेप्ती येथील छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त संविधानाची शपथ घेताना प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे, इतर प्राध्यापक व विद्यार्थी.

# छत्रपती अभियांत्रिकीमध्ये संविधान दिवस साजरा

नगर – दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये संविधान दिवस २६ नोव्हेंबर रोजी सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये साजरा करण्यात आला. संविधान हा भारताचा सर्वोच्च कायदा आहे. हा एक लिखित दस्तऐवज आहे जो मूलभूत कोड, रचना, कार्यपद्धती, अधिकार, नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये यांचे सीमांकन करणारा फ्रेमवर्क देतो, असे मत प्राचार्य डॉ.वाय. आर.खर्डे यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून आयोजित या कार्यक्रमाप्रसंगी प्रा. टी.पी. धंगेकर यांनी विद्यार्थ्यांना संविधान दिवसाचे महत्त्व त्याचबरोबर त्याचा इतिहास याविषयी मार्गदर्शन केले. प्रा.ए.जी.देखणे यांनी संविधानाची उद्देशिका यावेळी सर्वांसमोर वाचून दाखवली. भारतीय राज्यघटनेची उद्देशिका हे संविधानाची मूलभूत तत्त्वे आणि उद्दिष्टे सांगणारे प्रास्ताविक विधान आहे. हे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारले आणि २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आले, जो भारताचा प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय संविधानाची उद्देशिका ही आपल्या संविधानाचे एक संक्षिप्त स्वरूप आहे.

या प्रसंगी विभाग प्रमुख डॉ.एम.के.भोसले, प्रा.एस.एम.वाळके, प्रा.पी.जी.निकम, प्रा.ए.बी. काळे, प्रा. व्ही.व्ही पाटील, प्रा. एस. पी. विधाते आदी उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे सुख म्हणजे नक्की काय या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. अरुण कुलकर्णी (छाया – हेमंत ढाकेफळकर)

# 'त्याग' हा सुखी जीवनाचा मूलमंत्र आहे

### प्रा. अरुण कुलकर्णी यांचे प्रतिपादन; सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे व्याख्यानाचे आयोजन

नगर – सुख कशात आहे? पैसा, बंगला, गाडी, कुटुंब यामध्ये सुख असते ही भ्रामक कल्पना आहे. म्हणूनच सत्ता, मान, प्रतिष्ठा, स्थैर्य असून सुद्धा आजकाल मनुष्य समाधानी नाही. समर्थांच्या उक्तीप्रमाणे जगी सर्व सुखी असा कोण आहे. याचाच आज प्रत्येकाने मनात विचार करून स्वप्नवत सुखाच्या मागे न लागता त्यागमय जीवनाच्या अंगीकार करून सुख व शांती आत्मसात करावी असे प्रतिपादन प्रा. अरुण कुलकर्णी यांनी यावेळी केले.

सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे सुख म्हणजे नक्की काय? या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचचे आदिनाथ जोशी, मोरेश्वर मुळे, बलभीम पांडव, सुरेश कुलकर्णी, सर्वोत्तम क्षीरसागर, ज्योती केसकर, पुष्पा चितांबर, शोभा ढेपे, स्नेहल वेलणकर, माधव कुलकर्णी आदी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, मनुष्य आनंदाच्या प्राप्तीसाठी सदैव धडपडत असतो परंतु खरा आनंद दुसऱ्याला वाटल्याने मिळतो. म्हणून आपल्या जवळ जे आहे त्यात प्रत्येकाने सुख पाहावयास हवे.

यावेळी श्री. ब्रह्मे यांनी सभासदांना 'उतराई' हा कथासंग्रह असलेले पुस्तक भेट दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शरद कुलकर्णी यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय बलभीम पांडव यांनी करून दिला. सूत्रसंचालन ज्योती केसकर यांनी केले.

# सभासदांच्या निरोगी आरोग्यासाठी महापालिका पतसंस्था कटिबद्ध

### बाळासाहेब पवार यांचे प्रतिपादन; कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने सभासदाच्या दुर्धर आजाराच्या उपचारासाठी आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्त



मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्यावतीने सभासदांच्या दुर्धर आजाराच्या उपचारासाठी आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द करताना चेअरमन बाळासाहेब पवार. समवेत पतसंस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी. (छाया – लहू दळवी)

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेला सुमारे १०० वर्षाची उज्वल परंपरा असून सभासदांच्या जोरावर संस्थेने यशस्वी भरारी घेतली आहे त्यामुळे सभासदांच्या हिताचे निर्णय घेतले जात असून त्यांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होत सभासदांच्या आरोग्याची तात्काळ तपासणी होऊन उपचार घेण्यासाठी तातडीने आर्थिक मदतीचा धनादेश दिला जातो महापालिका कर्मचारी नेहमीच दैनंदिन कामांमध्ये व्यस्त असतात त्यामुळे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत असून आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे देखील आजारपण आपल्या अंगावर काढले जाते त्यामुळे एखाद्या सभासदाला मोठ्या आजाराला सामोरे जावे लागते यासाठी आजारपणाचे तात्काळ निदान होऊन त्यावर उपचार घेण्यासाठी पतसंस्था आपले कर्तव्य बजावत असून सभासदाच्या निरोगी आरोग्यासाठी महापालिका पतसंस्था कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन चेअरमन बाळासाहेब पवार यांनी केले

अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीन सभासद गोरक्षनाथ बहिरनाथ भोसले यांच्या दुर्धर आजाराच्या उपचारासाठी आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्त करताना चेअरमन बाळासाहेब पवार, व्हा. चेअरमन सोमनाथ सोनावणे, ज्येष्ठ संचालक जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुदगल, सतीश ताठे, बाळासाहेब गंगेकर, किशोर कानडे, श्रीधर देशपांडे, अजय कांबळे, गुलाब गाडे, कैलास चावरे, बलराज गायकवाड, विकास गीते, विजय कोतकर, संचालिका प्रमिला पवार, उषा वैराळ, कार्यलक्ष्मी संचालक आनंद तिवारी आदी उपस्थित होते.

अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्था संचालक मंडळाने पारदर्शक कारभार करून सभासदाच्या हिताचे निर्णय घेतले जात असतात मुला मुलींच्या शिक्षणासाठी व लग्न समारंभासाठी तातडीने कर्ज उपलब्ध करून दिले जाते सभासदाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सभासदांच्या आरोग्याच्या उपचारासाठी २५ हजार रुपयाच्या आर्थिक मदतीचा धनादेश दिला जातो पतसंस्था नियमित सभासदाच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहत असल्याचे मत ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल यांनी व्यक्त केले.

# सांगलीला जिजाऊ ब्रिगेडच्या राज्य अधिवेशनाचे आयोजन

### जिल्ह्यातील सर्व महिला पदाधिकारी व सदस्यांनी सहभागी व्हावे : अनिता काळे

नगर – मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेडचे राज्य अधिवेशन शनिवार (दि.३० नोव्हेंबर) व रविवार (दि. १ डिसेंबर) सांगली येथे होत आहे. या अधिवेशनासाठी जिल्ह्यातील सर्व महिला पदाधिकारी व सदस्यांनी सहभागी होण्याचे आवाहन मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे पाटील यांनी केले आहे.



वैचारिक संघटन असलेल्या महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी जिजाऊ ब्रिगेड संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत आहे. महिलांचे सक्षम ीकरण व प्रबोधन हे उद्दीष्ट समोर ठेऊन जिजाऊ ब्रिगेडचे कार्य सुरु आहे. वैचारिक चर्चा व प्रबोधन करण्यासाठी आज पर्यंत संघटनेने महाराष्ट्रात विविध ठिकाणी अधिवेशन आयोजित केली आहे.

सांगली येथे होणाऱ्या अधिवेशनामध्ये सांस्कृतिक, सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक, राजकीय, बौद्धिक विचारांची देवाणघेवाण होणार आहे. या अधिवेशनासाठी उपस्थित राहण्याचे म्हंटले आहे.



महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थिनींना बक्षीस वितरण करताना उद्योजक सचिन पटाले, सोमनाथ बनकर, प्राचार्य वासंती धुमाळ व शिक्षक वृंद.

# महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात बाल आनंद मेळावा

नगर – केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात आनंद मेळावा उत्साहात आयोजीत करण्यात आला. याप्रसंगी शाळेत प्रमुख पाहुणे म्हणून स्लायडर सायकल उद्योग समुहाचे संचालक सचिन पटाले उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय सायकलपटू व उद्योजक सोमनाथ बनकर उपस्थित होते. त्यांनी विद्यालयातीत विद्यार्थ्यांच्या अभ्यासा व्यक्तिरिक्त चित्रकला तसेच स्लो सायकल स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थिनीना प्रथम क्रमांक ४ सायकली द्वितीय क्रमांक स्कूल बॅग व तृतीय क्रमांक टिफिन देण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयश्री कोतकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सखाराम गारुडकर यांनी केला. कार्यक्रमाचे आभार रेणूका म्हस्के यांनी केले.

कार्यक्रमास मार्गदर्शन प्राचार्य वासंती धुमाळ यांनी केले. कार्यक्रमाचे संचलन व तयारी भारती गुंड, जालिंदर सातपुते राजेश सोनवणे यांनी केले. याप्रसंगी विविध खाद्य पदार्थाचे स्टॉल विद्यार्थिनीनी लावले होते. पावभाजी, समोसा, पेस्ट्री, वडा खाण्यासाठी गर्दी झाली होती, पालकांनी सुद्धा आनंद मेळाव्यात सहभाग नोंदविला.

# नगर शहरामध्ये ३० नोव्हेंबर व १ डिसेंबरला सत्यशोधक समाजाचे ४२ वे राज्य अधिवेशन

नगर – सत्यशोधक समाजाचे ४२ वे राज्य अधिवेशन बुरुडगाव रोड येथील नक्षत्र लॉन येथे ३० नोव्हेंबरला दुपारी १२ वाजता व १ डिसेंबर सायंकाळी ४ वाजता दोन सत्रात पार पाडण्यात येणार आहे. या राज्य अधिवेशनात सत्यशोधक समाजाच्या ध्वजारोहणाने अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

यामध्ये पहिल्या सत्रात भारतीय लोकशाही आणि सत्यशोधक तंत्रज्ञान, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अपेक्षा आणि वास्तव, सत्यशोधक कवी संमेलन व दुसऱ्या सत्रात भारतीय परंपरेचे अब्राहणी अवैधिक प्रवाह, महिलांची वर्तमान स्थिती सत्यशोधकीय आकलन, समकालीन शेती समस्या व सत्यशोधकांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. तसेच या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष म्हणून उत्तमराव पाटील, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड, सत्यशोधक समाज संघाचे अध्यक्ष अरविंद खैरनार, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक चे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, पशुसंवर्धन अधिकारी डॉ.प्रकाश हसनाळकर, सत्यशोधक विद्यापीठ यवतमाळ संचालक डॉ. ज्ञानेश्वर गोरे, सत्यशोधक समाजाचे माजी अध्यक्ष डॉ. अशोक चोपडे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे.

दुसऱ्या दिवशी रविवारी सायंकाळी ४ वाजता स्वागत अध्यक्ष उत्तमराव पाटील व प्रमुख पाहुणे जयसिंगपूरचे डॉ.राजेंद्र कुंभार, सिने अभिनेते व दिग्दर्शक सत्यशोधक किरण माने यांचे मनोगत व्यक्त होणार असून या अधिवेशनास उपस्थित राहण्याचे आवाहन स्वागत समितीचे प्रा.एल.बी. जाधव, विलास साठे, ज्ञानदेव खराडे सर, संदीप पानमळकर, संजय गारुडकर, अशोक शेवाळे, संजय शिंदे, रामभाऊ गवळी, यादव हजारे, भाऊसाहेब खुडे, दिलीप व्यवहारे, नचिकेत लोंढे, दिलीप खराडे, बापू चंदनशिवे, डी. आर. जाधव, डॉ.हनुमंत गायकवाड, शरद मेढे, डॉ.मेहबूब सय्यद, मुख्याध्यापक अल्हाट सर, प्रा. सूर्यवंशी सर यांनी आव्हान केले आहे.


निशाणी २९ ॲड. किरण एम. सोनी
दिनांक २८/११/२०२४

## जाहीर समन्स

**अहमदनगर येथील मे. १० वे सहदिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर (मा. श्री. मंदार पी. पांडे साहेब)**
यांचे कोर्टात...

विशेष दिवाणी दावा क्रमांक ७१ / २०२४

**वादी**
श्री. राहुल मच्छिंद्र ससाणे, वगैरे – ३
**प्रतिवादी**
श्री. बाळासाहेब पुंजाजी जगदाळे, वगैरे – १०

प्रतिवादी नं. १–
श्री. बाळासाहेब पुंजाजी जगदाळे
रा. प्लॉट नं. १०/३, माताजी नगर, एम. आय. डी. सी.,
नागापुर, बोल्हेगांव, अहमदनगर (महाराष्ट्र) ४१४१११

ज्या अर्थी वादी श्री. राहुल मच्छिंद्र ससाणे, वगैरे – ३ यांनी आपल्या विरुद्ध दाव्यांतील कलम–१ मधील मिळकतीचे खरेदीखत लिहून व नोंदवुन देण्याबाबत तसेच जाहीर ठराव, निरंतर ताकीद हुकूम मिळणेसाठी व इतर दादी मिळणेसाठी या न्यायालयात दावा दाखल केला आहे. तुम्हाला रजिष्टर्ड पोष्टाद्वारे समन्स काढले असता पोष्टमनने वेळोवेळी सुचना देऊनही सदरचे पाकीट स्विकारले नाही.

त्या अर्थी या दाव्यांतील मिळकतीचे वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक – १६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही स्वतः किंवा वकिलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर जाहीर समन्स बजावण्यात येत आहे. आपल्या कथनांचे समर्थनार्थ आपण ज्यावर विसंबुन राहणार आहात ते सर्व दस्तऐवज देखील आपण या न्यायालयासमोर सादर करावे. तुम्हाला समज देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी व वेळी उपस्थित राहण्यास आपण कसुर केल्यास आपले अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल. वर नमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पुर्वी बजावणी करिता तुमचा पत्ता दाखल करण्यास तुम्ही कसुर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक २८ / ११ / २०२४ रोजी आमचे शिक्यानिशी व कोर्टाचे शिक्यानिशी दिली असे.

तयार करणार सही
**क. लिपीक**
दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर)
अहमदनगर

कोर्टाचा शिक्का

हुकूमावरुन,
**अधिक्षक**
दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर)
अहमदनगर




**के जी.महाविद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरी**

के जी.महाविद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. वर्षा कीर्तने यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांचे सामाजिक कार्य व शैक्षणिक योगदानाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. चव्हाण सविता यांनी केले. प्रा. आरती खेडकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या प्रसंगी सौ.अमृता मुळे, सौ. हर्षाली रासकर व विद्यार्थी.

# माहिती अधिकार संघर्ष समितीच्या शहराध्यक्षपदी अरुण खिची यांची नियुक्ती



नगर – येथील अरुण खिची यांची माहिती अधिकार संघर्ष समितीच्या शहराध्यक्षपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अजय तुम्मे यांनी श्री. खिची यांच्या नियुक्तीची घोषणा करुन शनिवारी (दि.३० नोव्हेंबर) शिर्डी येथे होणाऱ्या संघटनेच्या अधिवेशनात त्यांना नियुक्ती पत्र देऊन सन्मान केला जाणार असल्याची माहिती दिली.

निस्वार्थी जनहित बहुउद्देशीय संस्था, सावली (जि. चंद्रपूर) संचलित माहिती अधिकार संघर्ष समिती माहिती अधिकार कायद्याची होत असलेली विडंबना यासाठी जबाबदार राज्य माहिती आयुक्त यांच्या तक्रारी करून निवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती होण्यासाठी जन आंदोलन छेडण्यास पुढाकार घेण्यात आलेला आहे. संघटनेची पुढील दिशा ठरविण्यासाठी शिर्डीला अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. तर यामध्ये सक्षम कार्यकर्ता निर्माण होण्यासाठी व अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार रोखून परिवर्तन घडविण्यासाठी कार्यकर्त्यांची भूमिकेबद्दल मार्गदर्शन केले जाणार आहे.

# सनातन संस्थेचा ३० नोव्हेंबरला रौप्य महोत्सवी सोहळ्याचे आयोजन

नगर – पणजी , गोवा राज्यात स्थापन झालेल्या आणि सध्या संपूर्ण भारतात सनातन हिंदु धर्माचा तेजस्वी प्रचार करणाऱ्या सनातन संस्थेचा रौप्य महोत्सवी सोहळा ३० नोव्हेंबर या दिवशी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे औचित्य साधून श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचा अमृत महोत्सवी सन्मान गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते केला जाणार आहे. या सोहळ्याला केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक, गोव्याचे पर्यटनमंत्री रोहन खंवटे आणि भाजपचे गोवा प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सदानंद तानावडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ यांचीही या कार्यक्रमाला वंदनीय उपस्थिती सोहळ्याला असणार आहे. या कार्यक्रमात अमृत महोत्सवी सन्मानानिमित्त स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचे होणारे मार्गदर्शन म्हणजे गोमंतकियांसाठी अमूल्य पर्वणीच आहे. या अमूल्य अशा क्षणाचा साक्षीदार होण्यासाठी गोमंतकियांनी या सोहळ्याला उपस्थित रहावे, असे आवाहन सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते चेतन राजहंस यांनी पणजी येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले. या पत्रकार परिषदेला 'गीता परिवार'चे महासचिव सुभाष नाईक आणि 'सनातन संस्थे'च्या सौ. शुभा सावंत यांचीही उपस्थिती होती.

सनातन संस्थेच्या रौप्य महोत्सवाविषयी अधिक माहिती देतांना श्री. राजहंस पुढे म्हणाले, ''सनातन संस्था ही आध्यात्मिक संस्था असून तिचे सर्व उपक्रम समाजाचे आध्यात्मिक कल्याण साध्य करणारे आहेत. सनातन संस्थेची २५ वर्षे म्हणजे समाजाच्या आध्यात्मिक सेवेची २५ वर्षे आहेत. सनातन धर्मातील अध्यात्म हे विज्ञान म्हणून अर्थात् 'अध्यात्मशास्त्र' म्हणून प्रस्थापित करण्यासाठी सनातन संस्थेने मोठे कार्य केले. अध्यात्मशास्त्रावरील सनातनची ग्रंथसंपदा आणि सनातन शिकवत असलेली 'गुरुकृपायोगानुसार साधना' यांमुळे आज १२२ साधक संत झाले असून १ हजारांहून अधिक साधकांचा प्रवास संतत्वाच्या दिशेने होत आहे. सनातन संस्थेच्या मार्गदर्शनामुळे हजारो लोक आज तणावमुक्त, व्यसनमुक्त आणि आनंदी जीवन जगत आहेत. रौप्य महोत्सवानिमित्त संस्थेने समाजातील सर्व घटकांसाठी निशुल्क तणावमुक्त आणि व्यसनमुक्त जीवनासाठी कार्यशाळा आयोजित केल्या. अशा सनातन संस्थेचा रौप्य महोत्सव आणि स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचा अमृत महोत्सव म्हणजे दुग्धशर्करायोगच आहे.''


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीबाबतचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर ठरलेला आहे परंतू खरेदीखत होणेपूर्वी मिळकतीच्या टायटलची खात्री करणे आवश्यक असल्यामुळे ही जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

विद्यमान मालकांचे म्हणणे असे आहे की, सदर मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निजोखमी असून कोणताही चालू वाद नाही अथवा कोणत्याही कोर्टामध्ये मिळकतीबाबत मिळकतीच्या बांधा बाबत चालू वाद नाही. मिळकत निर्वेध, निजोखमी असून, बोजाविरहित आहे इतपर कोणाचीही काही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, कुळ, बांध, अथवा इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसाच्या** आत खालील पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रांच्या नक्कलासह समक्ष लेखी कळवून खात्री करुन द्यावी अथवा कोणाची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील. किंवा ज्याचे काही हक्क हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेल आहे असे समजून आमचे अशिल अतिंम व्यवहार पूरा करतील व त्यानंतर कुठलीही तक्रार चालणार नाही.

हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. २९/११/२०२४

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील **मौजे सावेडी** येथील खालील वर्णनाची मिळकत–

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|
| २५२/१/३/१ | ०.हे . ६७ आर |

यापैकी विद्यमान मालक नटवर जमनादास गुजराथी उर्फ नागर देवी यांचे मालकीचे क्षेत्र ० हे. ३३ आर ही आहे त्या स्थितीत संपूर्ण मिळकत.


**यांसी चतु:सीमा –**
पूर्वेस : सर्व्हे नंबर २५२ पैकी
दक्षिणेस : सर्व्हे नंबर २५२ / २
पश्चिमेस : सर्व्हे नंबर २५२ पैकी व रस्ता
उत्तरेस : सर्व्हे नंबर २५३

**सदर मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रामणे मालक–**
**नटवर जमनादास गुजराथी उर्फ नागर देवी (मालक)**
**वासुदेव जमनादास गुजराथी उर्फ देवी**
**(सहहिस्सेदार व्यवहारास मान्यता देणार आहे)**
दोघे रा. ३४९७, परदेशी गल्ली, अहमदनगर.

**ॲड.आर.टी.शर्मा**
**ॲड. गणेश एम. शर्मा**
फोन नं. २३४११०६, मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर


# थोर शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस

थोर शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस हे भारताचे पहिले जीवशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ व वनस्पतीशास्त्रज्ञ होते. जगदीशचंद्र बोस यांनी वनस्पतींमध्ये देखील प्राण्यांप्रमाणे संवेदना असतात हे हे प्रयोगाद्वारे सिद्ध केले. ऊन, पाऊस, थंडी, प्रकाश, ध्वनी यामुळे प्राण्यांप्रमाणे वनस्पतींमध्येही संवेदना निर्माण होतात हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी सेस्कोग्रफ नावाचे यंत्र बनवले. या यंत्राने वनस्पतींची संवेदना दहा हजार पटीने मोठी करून बघता येणे शक्य झाले. सेस्कोग्राफ हे यंत्र वनस्पती शास्त्रसाठी वरदान ठरले.



जगदीशचंद्र बोस यांचा जन्म ३० नोव्हेंबर १८५८ रोजी बंगालमधील (आताच्या बांगलादेशातील) मैमनसिंग येथे झाला त्यांचे वडील भगवानसिंग बोस हे सरकारी अधिकारी होते. लहानपणापासूनच जगदीशचंद्र बोस यांना आजूबाजूचा निसर्ग पाहायचे, त्याचे निरीक्षण करण्याची आवड होती. झाडे, पाने – फुले, प्राणी, पक्षी, फुलपाखरे यांचे निरीक्षण करणे हा त्यांचा आवडता छंद होता. जगदीशचंद्र बोस यांचे प्राथमिक शिक्षण गावातल्या शाळेत झाले. कोलकोता येथील सेंट झेवियर्स कॉलेजमधून इंटर मीडियट होऊन, कोलकोता युनिव्हर्सिटीमधून भौतिकशास्त्र व डॉक्टरकीचा अभ्यास करून इंग्लंडच्या ख्राईस्ट चर्च महाविद्यालयातून भौतिकी, रसायन, वनस्पतीशास्त्र व निसर्गशास्त्र यांचा अभ्यास करून भारतात परतले.

१८८५ साली ते भारतात परतल्यावर कोलकोत्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये भौतिकीच्या प्राध्यापक पदावर रुजू झाले. या पदावर रुजू होणारे ते पहिलेच भारतीय असल्यामुळे त्यांना वर्णभेदाला तोंड द्यावे लागले; पण काही वर्षांनंतर त्यांची योग्यता ओळखल्यावर असामान्य शास्त्रज्ञात त्यांची गणना होऊ लागली. १८८५ ते १८९५ या काळात भौतिकशास्त्र शिकवत असताना त्यांनी विद्युत शक्तीवर संशोधन केले. विद्युत चुंबकीय तरांगाचा शोध लावून त्यांनी बॅटरी बनवली. या शोधाची कीर्ती जगभर पसरली. प्रसिद्ध शास्त्रज्ञ पोईनकर आणि जे. जे. थॉम्पसन यांच्या लेखात या शोधाचा उल्लेख आहे. नेमलाईटच्या मदतीने संदेश पाठवण्यातही त्यांना यश मिळाले. विद्युत शक्तिवरील संशोधनानंतर जगदीशचंद्र बोस वनस्पती शास्त्राकडे वळले. सचेतन आणि अचेतन वस्तूंमधील साम्य आणि भेद यांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांनी या विषयावर लिहिलेल्या निबंधांना व दिलेल्या व्याख्यानांना सुरवातीला व्यापक मान्यता मिळाली नाही. १९०१ मध्ये त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटीला या विषयावर सादर केलेले निबंध स्वीकारण्यात आले नाही. याचे अंशतः कारण म्हणजे त्यांनी या विषयाचे तत्वज्ञानात्मक विवरण केले होते. तथापि वनस्पतींच्या वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी योजलेल्या वनस्पतींच्या अतिसूक्ष्म हालचालींची नोंद करणाऱ्या अतिशय संवेदनशील स्वयंचलित उपकरणाबद्दल आणि या उपकरणाच्या सहाय्याने त्यांनी विविध उद्दीपनांमुळे होणाऱ्या वनस्पतींतील सूक्ष्म बदलांविषयी सातत्याने जमा केलेल्या माहितीबद्दल त्यांची कीर्ती जगभर पसरली. वनस्पतींच्या वाढीचे दहा हजार पट विवर्धन करू शकणारे सेस्कोग्राफ हे स्वयंचलित यंत्र त्यांनी तयार केले होते. या उपकरणाच्या साहाय्याने बोस यांनी वनस्पतींनाही संवेदनग्रह क्षमता असते, हे प्रयोगाद्वारे सिद्ध करून दाखवले. वनस्पती अन्न ग्रहण करतात, रात्री लवकर झोपतात, सकाळी लवकर उठवतात, मनुष्याप्रमाणे वनस्पतींचाही जन्म, विकास आणि मृत्यू होतो हे जगदीशचंद्र बोस यांनी सिद्ध केले. वनस्पती शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी क्रेस्कोग्राफ, रेझोनंट रेकॉर्डर, एसिलेटिंग रेकॉर्डर, कंपाउंड लेव्हलर, बसलिंग ओपरेट्स इत्यादी उपकरणे त्यांनी तयार केली. १९२० साली त्यांना रॉयल सोसायटीची फेलोशिप मिळाली. सण १९३६ मध्ये त्यांनी कोलकोत्यात बोस इन्स्टिट्यूट रिसर्चची स्थापना केली. संस्थेचे मुखपत्रही सुरू केले. जगदीशचंद्र बोस यांनी इरीटेबीलिटी ऑफ प्लॅन्टस्, इलेक्ट्रोफीजिओलॉजी ऑफ प्लॅन्टस. ट्रॉपीक मुव्हमेंट अँड ग्रोथ ऑफ प्लॅन्टस्, द नर्व्हस मेकॅनिजम ऑफ प्लॅन्टस्, प्लॅन्टरिस्पॉन्स १९०६, लाईफ मुव्हमेंट प्लॅन्टस् (भाग १ ते ४) द फिजीऑलॉजी ऑफ फोटोसिंथेसिस, मोटार मेकॅनिजम ऑफ प्लॅन्टस्, रिस्पॉन्सेस इन द लिव्हिंग अँड नॉन लिव्हिंग १९०६ इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. केंब्रिज विद्यापीठाने त्यांना १८९६ मध्ये डी एस सी पदवी दिली. द रॉयल सोसायटीने त्यांना १९२० मध्ये सदस्यत्व बहाल केले. ब्रिटिश सरकारने १९१७ मध्ये त्यांना नाईट हा किताब देऊन त्यांचा गौरव केला. जगदीशचंद्र बोस अत्यंत देशाभिमानी शास्त्रज्ञ होते. भारतीयांनी आपल्या महान सांस्कृतिक परंपरेत वैज्ञानिक संशोधन करून भर घालावी, अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी कोलकोता विद्यापीठात आणि नंतर बोस रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये संशोधनाला अतिशय प्रोत्साहन दिले. जगदीशचंद्र बोस यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी २३ नोव्हेंबर १९३७ रोजी बंगालमधील (आता बिहारमधील) गिरिडी येथे निधन झाले.

जगदीशचंद्र बोस म्हणजे संशोधन, ज्ञाननिष्ठा, प्रयोगशीलता, चिकाटी, दातृत्व व देशभक्तीचा अंतिम शब्द.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## नागवेलीच्या पानांचे आरोग्यलाभ

**आपल्याकडे जेवणानंतर मुखशुद्धीसाठी नागवेलीचे पान खाल्ले जात असते. अगदी देवदेवतांनाही भोजनोत्तर विडा अर्पण केला जातो व पूजेवेळीही ही पाने सुपारीसह ठेवली जात असतात. नागवेली ही वनस्पती पायपरेसी कुळातील असून तिचे शास्त्रीय नाव पायपर बिटल आहे. तिला पानवेल, विड्याची पाने किंवा खाऊची पाने असेही म्हणतात. मिरी ही वनस्पतीही याच कुळातील आहे. नागवेली वनस्पती मुळात भारत, बांगला देश, नेपाळ व श्रीलंका या देशांतील असावी. आशियात तिची पाने मोठ्या प्रमाणावर खाल्ली जातात. भारतासह आशिया खंडातील काही देशांत तिची लागवड केली जाते. उष्ण व ओलसर हवामानात ही वेल चांगली फोफावते. या नागवेलीच्या म्हणजेच विड्याच्या पानांचा आरोग्यासाठीही लाभ होतो. त्याची ही माहिती...**

**पचन सुधारते :** नागवेलीच्या पानांमध्ये आढळणारे एन्झाईम्स पचनक्रिया सुधारण्यास मदत करतात. ते अन्न पचण्यास सुलभ करते आणि बद्धकोष्ठतेपासून आराम देते.

**श्वासाची दुर्गंधी दूर करते :** नागवेलीच्या पानांमध्ये असलेले तेल आणि जंतुनाशक गुणधर्म श्वासाची दुर्गंधी दूर करण्यास मदत करतात. तोंड ताजे आणि स्वच्छ राहते.

**दात निरोगी ठेवते :** नागवेलीच्या पानांमध्ये असलेले बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म दात निरोगी ठेवण्यास मदत करतात. हे दातांमध्ये प्लेक आणि पोकळी तयार होण्यास प्रतिबंध करते.

**तणाव कमी करते :** नागवेलीच्या पानांमध्ये असलेले काही घटक तणाव कमी करण्यास मदत करतात. हे मन शांत आणि आरामदायी बनवते.

**खोकला आणि सर्दीपासून आराम :** नागवेलीच्या पानांमध्ये असलेले काही घटक खोकला आणि सर्दीपासून आराम देण्यास मदत करतात. त्यामुळे श्वसनसंस्था निरोगी राहण्यास मदत होते.



**रक्तदाब नियंत्रित करते :** नागवेलीच्या पानांमध्ये असलेले काही घटक रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो.

**त्वचा निरोगी ठेवते :** नागवेलीच्या पानांमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतात. यामुळे त्वचा चमकदार आणि मुलायम होते.


**लक्षात ठेवा :** नागवेलीच्या पानांमध्ये कॅटेकॉल नावाचे तत्त्व असते ज्यामुळे कर्करोग होऊ शकतो. त्यामुळे नागवेलीची पाने मर्यादित प्रमाणातच खावीत.

तंबाखूसारख्या पदार्थांमध्ये मिसळून पान खाणे आरोग्यासाठी हानिकारक आहे. नागवेलीची पाने गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांनी खाऊ नयेत. नागवेलीचे पान अनेक आरोग्य फायद्यांनी परिपूर्ण आहे, परंतु त्याचे सेवन मर्यादित प्रमाणातच केले पाहिजे.

## आता पेशींची हानी रोखता येणार

सध्याचा जमाना आर्टिफिशियल इंटेलिजन्स, रोबो, थ्रीडी प्रिंटिंग आणि नॅनो टेक्नॉलॉजीचा आहे. आरोग्याच्या क्षेत्रातही नॅनो टेक्नॉलॉजी वापरता येऊ शकते हे भारतातीलच वैज्ञानिकांनी दाखवले आहे. व्हॅनाडियापासून तयार केलेल्या नॅनोवायर्स या मानवी शरीरातील पेशींची हानी रोखतात असे बंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस येथील वैज्ञानिकांनी केलेल्या संशोधनात स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे वार्धक्यामुळे होणाऱ्या रोगांवर नवीन उपचार शक्य होऊ शकतात.


हृदयरोग, कंपवात व स्मृतिभ्रंश यांसारखे वार्धक्याबरोबर होणारे रोग यावर नवीन औषधे तयार करणे त्यामुळे शक्य होईल. व्हॅनेडियम ऑक्साईड किंवा व्हॅनाडिया हे व्हॅनाडियमचे एक रूप असून ते आवर्तीसारणीत टिटॅनियमच्या जवळ सापडते. पेशींच्या चयापचय क्रियेत रिॲक्टिव्ह ऑक्सिजन स्पेसीज (आरओएस)ची निर्मिती होते व त्यात वाढ झाल्यास पेशींची नेहमीची रिडॉक्स अवस्था विस्कळीत होते त्यामुळे पेशीतील प्रथिने, मेदाम्ले व डीएनए या घटकांना हानी पोहोचते. आरओएसमुळे ऑक्सिडेटिव्ह ताण निर्माण होऊन आपल्याला अनेक रोग होतात,




त्यात कर्करोग, संधिवात, मूत्रपिंडाचे विकार यांचा समावेश आहे. आरओएसवर नियंत्रण ठेवण्यासाठी वापरली जाणारी अनेक औषधे ही कमी प्रमाणात आरओएसची उलट निर्मिती करतात, त्यामुळे नैसर्गिक निर्विषीकरण मार्गाची नक्कल करण्याचा आमचा विचार आहे, असे संशोधन पथकाचे प्रमुख जी. मुगेश व पॅट्रिक डिसिल्व्हा यांनी म्हटले होते. 'नेचर कम्युनिकेशन्स' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार व्हॅनाडिया नॅनोवायर्स या नसश्गक अँटी ऑक्सिडंटची नक्कल करतात. आरओएस हे एका विशिष्ट मात्रेत असेल तर उपकारक असते.

अनेक जैव रासायनिक क्रियात ते दुय्यम संदेशवाहकाचे काम करते व शरीरातील चयापचय क्रिया सुरळीत राहण्यासाठी त्याचा उपयोग असतो. मानवी शरीरात जास्त झालेले आरओएस बाहेर काढण्यासाठी काही यंत्रणा असतात, त्यात हायड्रोजन पेरॉक्साईडचा समावेश आहे. जेव्हा आपल्याला एखादा रोग होतो तेव्हा आरओएसचे प्रमाण वाढते व त्यात नैसर्गिक निचरा होण्याची प्रक्रिया टिकाव धरत नाही, पण आपण कृत्रिम पद्धतीने आरओएसचे नियंत्रण करू शकतो, असे डिसिल्व्हा यांनी म्हटले आहे.

## आकाशगंगा उपाशी मरतेय...



एकेकाळी कृष्णविवरांचे अस्तित्व केवळ सैद्धांतिक रूपात मानले जात असे. काही संशोधकांना तर ते खरोखर अस्तित्वात नसावेत, असेही वाटत होते; मात्र आता त्यांचे अस्तित्व केवळ सर्वमान्यच झालेले आहे असे नाही तर त्यांचे छायाचित्रही टिपण्यात यश आलेले आहे. प्रत्येक आकाशगंगेच्या केंद्रस्थानी एक शक्तिशाली कृष्णविवर असते. प्रचंड आकर्षणशक्ती असलेल्या अशा कृष्णविवरांमध्ये आजूबाजूचे सर्व घटक गडप होत असतात. असे सुपरमॅसिव्ह ब्लॅक होल आपल्या यजमान आकाशगंगेतील इंधनही हिसकावून घेऊ शकतात, असे मानले जात होते. त्याची आता जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपने पुष्टी केली आहे. या अंतराळ दुर्बिणीने एका अशा कृष्णविवराचा शोध घेतला आहे जे आपल्याच आकाशगंगेतील इंधन खाऊन तिला जणू काही उपाशी मारत आहे!

कृष्णविवराकडून असे इंधन खाल्ले जात असल्याने आकाशगंगेकडे नवे तारे बनवण्यासाठी सामग्री शिल्लक राहत नाही व ती हळूहळू मृत होत जाते, म्हणजेच नष्ट होते. अशीच एक आकाशगंगा 'जेम्स वेब'ने शोधली असून तिला 'जीएस-१०५७८' असे नाव देण्यात आले आहे. या आकाशगंगेला 'पाब्लोची गॅलेक्सी' असेही म्हटले जाते. आपली पृथ्वी व संपूर्ण ग्रहमालिका ज्या आकाशगंगेचा एक भाग आहे त्या 'मिल्की वे' इतकाच तिचाही आकार आहे. ही आकाशगंगा पृथ्वीपासून १२ अब्ज प्रकाशवर्ष अंतरावर आहे. ज्यावेळी ब्रह्मांडाचे वय अवघे २ अब्ज वर्षे होते, त्यावेळी ही आकाशगंगा निर्माण झाली होती.

या आकाशगंगेचे वस्तुमान आपल्या सूर्याच्या वस्तुमानापेक्षा २०० अब्ज पट अधिक आहे. पाब्लोच्या आकाशगंगेत बनलेल्या सध्याच्या बहुतांश ताऱ्यांची निर्मिती १२.५ ते ११.५ अब्ज वर्षांपूर्वी झाली होती. 'नेचर ॲस्ट्रॉनॉमी' या नियतकालिकात याबाबतच्या संशोधनाची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. केम्बिज युनिव्हर्सिटीतील कालवी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्मोलॉजीमधील फ्रांसेस्को डी' यूजेनियो यांनी याबाबतचे संशोधन केले. त्यांनी सांगितले की सुरुवातीच्या निरीक्षणातूनच आम्ही ओळखले होते की ही आकाशगंगा जणू काही विझून गेली आहे. तिच्या आकाराचा विचार करता त्यामध्ये अधिक तारे बनत नाहीत. तिने आपले बहुतांश इंधन गमावले असल्याने नवे तारे बनवण्यासाठी तिच्याकडे आता पुरेशी सामग्री शिल्लक नाही.

## जास्वंदाच्या चहाचे आरोग्यलाभ

जास्वंदाला इंग्रजीत 'हिबिस्कस' या नावाने ओळखले जाते. जास्वंद ही आशिया खंडात आढळणारी सदारहरित वनस्पती आहे. भारतात कित्येक वर्षांपासून जास्वंदाच्या फुलांचा वापर पूजा आणि विधींसाठी केला जातो. जास्वंदाच्या फुलांच्या पाकळ्या सुकवून त्यांचा नैसर्गिक रंग म्हणून वापर केला जातो. पण तुम्हाला माहिती आहे का, बाप्पांच्या आवडत्या जास्वंदाचे आरोग्यासाठीही अनेक फायदे आहेत. विशेषतः जास्वंदाचा चहाही आरोग्यासाठी गुणकारी असतो.

जास्वंदाचा चहा किंवा जास्वंदाचा अर्क हा मेंदूसाठी अत्यंत उपयुक्त असतो. अस्वस्थता जाणवत असेल, रक्तदाबाची समस्या असेल तर त्यावर जास्वंदाचा चहा पिणे अत्यंत उपयुक्त ठरू शकते, असे तज्ज्ञ सांगतात. तुम्ही जे पाणी पिता, त्यात जास्वंदाचे परागकण काढून त्याच्या पाकळ्या टाकून ते पाणी प्यायले तर तुमच्या शरीराला चांगले अँटिऑक्सिडंट मिळतात. जर त्वचेच्या समस्या असतील तर जास्वंदाची पावडर, जास्वंदाच्या पाकळ्यांचे पाणी, जास्वंदाचा चहा (हिबिस्कर टी) प्यायल्यास अत्यंत उपयुक्त ठरू शकते. पोटाच्या समस्या असतील तर जास्वंदाचा चहा फायदेशीर ठरू शकतो. कारण तो सहज पचवता येतो.

**जास्वंदाच्या चहाचे आणखी काही फायदे :**

जास्वंदाच्या चहामध्ये शक्तिशाली अँटिऑक्सिडंटस्? भरपूर असतात. ते शरीरातील मुक्त रॅडिकल संयुगाशी लढण्यास मदत करतात. उच्च रक्तदाबामुळे हृदयावर अतिरिक्त ताण पडतो आणि ते कमकुवत होऊ शकते. नैसर्गिक उपायांसाठी जास्वंदाच्या चहाचे सेवन केले जाऊ शकते. परंतु जर एखाद्याला तीव्र रक्तदाबाचा त्रास होत असेल आणि औषधोपचार होत असतील तर अशा नैसर्गिक उपायांमध्ये सहभागी होण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. रक्तातील फॅटस्चे प्रमाण विविध हृदयविकारांना कारणीभूत ठरू शकते, म्हणून एक कप गरम जास्वंदाचा चहा प्यायल्याने नैसर्गिकरीत्या खराब कोलेस्ट्रॉल कमी होऊ शकते आणि शरीर आतून लवकर बरे होऊ शकते. जास्वंदाच्या अर्कामुळे कोलेस्ट्रॉल आणि ट्रायग्लिसराइडस्? कमी होतात, ज्यामुळे लठ्ठपणाचा धोका कमी होतो. बीएमआय पातळी कमी करणेदेखील फायदेशीर आहे. ज्या लोकांना सतत मूड स्विंग, मळमळ किंवा अस्वस्थता असते, त्यांनी नियमित जास्वंदाचा गरम चहा प्यावा, कारण ते तुमच्या मज्जातंतूंना शांत करते आणि तुम्हाला आराम देते.



## फळमाशांचाही मेंदू असतो तल्लख!

मानवाचा मेंदू म्हणजे निसर्गाची सर्वात थक्क करणारी करामत आहे. मानवाने बुद्धीच्या जोरावरच जगात आपले साम्राज्य बनवलेले आहे. मात्र मानवाशिवायही अनेक जीवांमध्ये त्यांचे जीवनयापन करण्यासाठी योग्य अशी बुद्धी असते. जी फळमाशी फळांना सडवते, तिच्याकडे नसती आफत म्हणून आपण पाहात असलो तरी ती फार चतुर असते व तिचा मेंदूही तल्लख असतो. कुठलीही कृती करण्यापूर्वी फळमाशी विचार करते, असे ऑक्सफर्डच्या संशोधकांनी म्हटले आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठातील मेंदू वैज्ञानिकांनी याबाबतचे संशोधन केले असून कुठलेही अवघड निर्णय घेताना फळमाशी बराच काळ विचार करते.

फळमाश्यांवर करण्यात आलेल्या प्रयोगात त्यांना वासातील फरक ओळखण्यास प्रवृत्त करण्यात आले. त्यावेळी त्यांनी या वासांना सरधोपटपणे प्रतिसाद दिला नाही, तर त्यातील पर्याय निवडताना



त्यांनी संपूर्ण विचार केल्याचे दिसून आले. त्यांनी त्यापूर्वी बरीच माहिती गोळा केली हे त्यांच्या उच्च बुद्धिमत्तेचे लक्षण समजले जाते. माकडे किंवा माणूस यांच्या जवळपास जाणारी बुद्धिमत्ता त्यांना असल्याचे दिसून आले आहे. कुठल्याही गोष्टीवर अविचाराने प्रतिक्रिया न देता थांबून विचार करून प्रतिक्रिया देणे हे महत्त्वाचे असते तरच बोधन व बुद्धिमत्ता या दोन बाबी आपल्याला त्यात प्रतीत होतात, असे प्रा. गेरो मिसेबॉक यांनी सांगितले.

त्यांच्या मते फळमाशीमध्ये मेंदूची शक्ती आश्चर्यकारक असते.

पण, अजून त्याची ओळख पटली नव्हती. एफओएक्सपी हे जनुक फळमाशीच्या मेंदूतील २०० न्यूरॉन्समध्ये असते; त्याचा फळमाशीच्या मेंदूतील निर्णय प्रक्रियेशी संबंध असतो. ड्रासोफिला या फळमाशीवर केलेल्या प्रयोगात त्यांना एका खास कक्षात ठेवून वास ओळखण्यास प्रवृत्त केले गेले. त्यात असे दिसून आले की, त्यांच्या निर्णय क्षमतेची गणितीय प्रारूपे ही माकड व माणूस यांच्याशी साधर्म्य असलेली आहेत. 'सायन्स' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

## साबण नव्हता तेव्हा...

आपल्या दैनंदिन जीवनात काही वस्तूंचे स्थान अढळ आहे. त्यामध्ये साबणाचा समावेश होतो. आंघोळीसाठी आणि एरवीही हात-पाय किंवा चेहरा स्वच्छ धुण्यासाठी साबण हवा असतो. मात्र साबणाचा शोध लागण्यापूर्वी किंवा त्याचा असा वापर सुरू होण्यापूर्वी लोक स्वतःला कसे स्वच्छ ठेवत, याचा कधी विचार केला आहे का? अर्थातच संशोधक मंडळींना याबाबतचेही कुतूहल होते. त्याबाबतचाही काही मागोवा घेण्यात आलेला आहे.

साबणाचा शोध लागण्यापूर्वी शरीर स्वच्छ ठेवण्यासाठी अर्थातच पाण्याचाच सर्वाधिक वापर होत असे. सिंधू संस्कृतीमध्ये सार्वजनिक स्नानगृहे होती व तसे एक स्नानगृह मोहेंजोदाडो येथे सापडलेही आहे. सध्याच्या भारत, पाकिस्तान व अफगाणिस्तानच्या भागात चार-पाच हजार वर्षांपूर्वी ही संस्कृती नांदत होती. त्या काळातील लोकांनी सध्या पाकिस्तानात असलेल्या मोहेंजोदाडो येथे अत्यंत सुरेख असे सार्वजनिक स्नानगृह बांधले होते. स्टीम बाथिंगचे हे एक सर्वात जुने उदाहरण आहे. रोमन काळातील सार्वजनिक स्नानगृहेही युरोपमध्ये अनेक ठिकाणी आढळतात.

मात्र वैयक्तिक स्वच्छतेसाठी केवळ वाफेचे किंवा पाण्याचे स्नान पुरेसे नव्हतेच. मिसिसिपी स्टेट युनिव्हर्सिटीतील ज्युडिथ रिडनर यांनी सांगितले की, जुन्या काळात अनेक लोकांची वैयक्तिक स्वच्छता साबणासारख्या सुविधेच्या कमतरतेने कमीच असू शकते. साबणामध्ये जरी काही अतिरिक्त घटक असले तरी मूळ घटकांमध्ये पाण्यात विद्राव्य अशा अल्कली व फॅटचा समावेश असतो, असे अल्बानी स्टेट युनिव्हर्सिटीतील क्रिस्टाईन कोंकोल यांनी सांगितले. साबणाच्या रेणूंमध्ये पाण्याला आकर्षित करणारे मुख तसेच ग्रीस-तेल यांना आकर्षित करणारी कार्बन साखळी असते. ही साखळी घाणीच्या रेणूंभोवती गुंडाळली जाऊन त्यांना वर खेचून बाहेर काढते, असेही त्यांनी सांगितले.

हाच बेसिक फॉर्म्युला प्राचीन काळातील साबणासारख्या वस्तूंमध्ये वापरला जात असे. त्या काळातील अशा वस्तूंमध्ये वनस्पती, प्राणीजन्य घटक, तेल, वाळू किंवा लाकडाची राख असे घटक समाविष्ट होते. अर्थातच आधुनिक असो किंवा प्राचीन, साबण हा कालौघात नाश पावणारा पदार्थ असल्याने प्राचीन साबणांचा माग काढणे संशोधकांसाठी कठीणच आहे, असे नॉर्थ डकोटा स्टेट युनिव्हर्सिटीतील रासायनिक संशोधक सेथ रास्मसेन यांनी सांगितले.



## रद्दी पेपरनं पालटलं नशीब

पैसा, सोनं याची आवड कुणाला नसते? सर्वांनाच असते; पण ते सर्वांच्याच नशिबातही नसते. असते त्याच्याकडे भरपूर आणि नाही त्याच्याकडे काहीच नाही, असे कित्येकदा दिसून येते. पण, काही वेळा नशिबाची दारे उघडतात आणि असा चमत्कार घडतो की, काही क्षणात गरीबही श्रीमंत होतो. असाच चमत्कार एका मुलाच्या आयुष्यात घडला. मॅट विंटर असे या मुलाचे नाव आहे. कॅनब्रुक, कैंट येथील मॅट विंटर ११ वर्षांचा होता, त्यावेळी त्याने एका महिलेला कचरा पिशवी फेकताना पाहिले. पिशवीत काळे आणि पांढरे टाकाऊ कागद होते. मॅटने महिलेला विचारले की, तो हे पेपर घेऊ शकतो का? महिलेने होकार दिल्यानंतर त्याने नाईट, डेथ अँड द डेव्हिल डिझाईन असलेला एक पेपर स्वतःकडे ठेवला. त्याचा त्याला किती फायदा होणार आहे, याची कल्पना त्याला त्यावेळी नव्हती.



१३ वर्षांनंतर वयाच्या २४ व्या वर्षी मॅट विंटरला समजले की, त्याने लहानपणी जो पेपर उचलला, त्यावर जे पेंटिंग होते ते सामान्य अजिबात नव्हते. जर्मनीत जन्मलेल्या अल्ब्रेक्ट ड्युरर यांनी काढलेले ते पेंटिंग १५१३ मध्ये रेखाटण्यात आले होते.

डेली स्टारच्या रिपोर्टनुसार, रेनेसाँच्या काळात बनवलेल्या या पेंटिंगचा रेअर बुक ऑक्शन्सतर्फे लिलाव करण्यात येत आहे. रेअर बुक ऑक्शन्सचे संचालक जिम म्हणाले की, त्यांनी ते नीट तपासले आणि समजले की, ते पेंटिंग ड्युररेशिवाय इतर कोणीही रेखाटलेले नसावे. या पेंटिंगचा लिलाव १८ सप्टेंबर रोजी होणार आहे. त्याची किंमत किमान २२ लाख रुपये असेल आणि ती प्रत्यक्ष लिलावात आणखी वाढू शकते.

## व्यायाम करण्यापूर्वी...

**संतुलित आहार आणि नियमित व्यायाम ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे; मात्र तयारीशिवाय व्यायाम करणे देखील तुमच्यासाठी धोकादायक ठरू शकते, असे तज्ज्ञ सांगतात. विशेषत: कोणत्याही तयारीशिवाय व्यायाम सुरू केल्यास हृदयविकाराचा धोका वाढतो. त्यामुळे व्यायाम करण्यापूर्वी काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्याबाबतची ही माहिती...**

व्यायाम सुरू करण्यापूर्वी वॉर्मअप करणे खूप महत्त्वाचे आहे. वॉर्मअप केल्याने तुमच्या शरीराचे तापमान वाढते, स्नायू लवचिक होतात आणि हळूहळू तुमची हृदय गती वाढते. हे तुमचे शरीर व्यायामासाठी तयार होण्यास मदत करते आणि हृदयविकाराचा धोका कमी करते. तुम्हाला आधीच कोणत्याही आजाराने, विशेषत: हृदयविकाराने ग्रासले असल्यास, व्यायाम सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. तुमच्यासाठी कोणता व्यायाम सुरक्षित आहे आणि तुम्ही तो किती काळ करावा हे डॉक्टर तुम्हाला सांगतील. जर



तुम्ही बऱ्याच काळापासून व्यायाम करत नसाल तर हळूहळू सुरुवात करा.

पहिल्या दिवशी जास्त व्यायाम करण्याचा प्रयत्न करू नका. तुमच्या व्यायामाचा कालावधी आणि तीव्रता हळूहळू वाढवा. व्यायाम करण्यापूर्वी आणि नंतर भरपूर पाणी प्या. पाणी तुमच्या शरीराला हायड्रेट ठेवते आणि शरीराचे तापमान नियंत्रित ठेवते. व्यायामासाठी सैल आणि आरामदायी कपडे घाला.

तुमच्या शरीराला श्वास घेता येईल असे कपडे घाला. व्यायाम करण्यासाठी सुरक्षित आणि स्वच्छ जागा निवडा. तुम्ही बाहेर व्यायाम करत असाल तर उन्हापासून बचाव करण्यासाठी टोपी घाला. आपल्या मर्यादा जाणून घेणे खूप महत्त्वाचे आहे. व्यायाम करताना तुम्हाला वेदना किंवा अस्वस्थता जाणवत असल्यास, ताबडतोब थांबवा. व्यायाम संपल्यानंतर थंड होणे महत्त्वाचे आहे. कूल-डाऊन हळूहळू तुमच्या शरीराचे तापमान कमी करते आणि स्नायूंचा ताण कमी करते. नियमित व्यायाम केल्याने तुमचे शरीर तंदुरुस्त राहते आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो.

# राज्य सब-ज्युनियर तायक्कांदो स्पर्धेत नगर जिल्ह्याला दोन सुवर्ण, एक रौप्य

## पदकविजेत्या स्वाती, ईश्वरी पंचकुला येथे रवाना

नगर – राज्य सब–ज्युनियर तायक्कांदो स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा संघटनेच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत दोन सुवर्ण, एक रौप्य आणि दोन ब्राँझ पदक पटाकाविली आहेत. सुवर्णपदक विजेते स्वाती भोसले व ईश्वरी रोडे या खेळाडूंची पंचकुला (हरियाणा) येथे आयोजित राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.



जळगाव तायक्कांदो स्पर्धेत विजेते खेळाडू. समवेत अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, सचिव संतोष बारगजे, महेश मुरादे, सुरेश वाघ, गणेश धीवर, निकिता लखारे आदी.

जळगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुलच्या बॅडमिंटन हॉलमध्ये तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या मान्यतेने जळगाव जिल्हा तायक्कांदो असोसिएशनतर्फे राज्य स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेमध्ये जिल्ह्याचा १४ मुले व १४ मुलींचा संघ सहभागी झाला होता. विविध वजनी गटात आयोजित राज्य स्पर्धेत २४ किलो खालील गटात स्वाती भोसले, ४७ किलो खालील गटात ईश्वरी रोडे यांनी सुवर्णपदक, तर रौप्य पदक स्नेहा गुंजाळ, रुक्मिणी शेलार, सिद्धांत त्रिपाठी, सृष्टी उदमले यांनी ब्राँझपदके पटकाविली आहेत.

या खेळाडूंचे राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष डॉ. एकनाथ मुंडे, सचिव संतोष बारगजे, सहसचिव अलताफ कडकाले, शकील सय्यद, सुरेश वाघ, गणेश धीवर, अंबादास साठे, सचिन आगळे, गोरक्षनाथ गालम, महेश मुरादे, लक्ष्मण शिंदे, रवी यादव, बाबासाहेब क्षीरसागर, दिनेशसिंग राजपूत, निकिता लखारे आदींनी अभिनंदन केले.

### दोन खेळाडू महाराष्ट्र संघात

स्पर्धेत राज्यातून ५५० खेळाडूंनी यशस्वी सहभाग नोंदवला. वाडिया पार्क येथे आयोजित जिल्हा स्पर्धेतून जिल्ह्याचा संघ निवडण्यात आला होता. राज्य स्पर्धेत दोन खेळाडूंनी सुवर्ण पदक पटाकाविले असून, त्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. हे दोन्ही खेळाडू रवाना झाले असून, त्यांचे प्रशिक्षक म्हणून गणेश धीवर मार्गदर्शन करणार आहेत.

# पीक स्पर्धेत सहभागी होण्याचे कृषी संचालकांचे आवाहन

नगर – कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या पिकांसाठी आयोजित पीक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत अर्ज करता येतील. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नाईकवाडी यांनी केले आहे.

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येते.

स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र सर्वसाधारण गटासाठी रक्कम रु.३०० व आदिवासी गटासाठी रक्कम रु. १५० असेल. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वत: कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल.

पीकस्पर्धेमध्ये सहभाग घेणाऱ्या शेतकऱ्याच्या स्वत:च्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. पीक स्पर्धा तालुका, जिल्हा व राज्यपातळीवर राबविण्यात येत आहे.

अर्जासोबत विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र–अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, ७/१२, ८–अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास), स्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा आदी कागदपत्रे जोडावी.

सर्वसाधारण व आदिवासी गटातील शेतकऱ्यांसाठी तालुका पातळीवर ५ हजार, ३ हजार व २ हजार रुपये असे अनुक्रमे पहिले, दुसरे व तिसरे बक्षीस असेल. जिल्हा पातळीवर १० हजार, ७ हजार व ५ हजार रुपये तर राज्यपातळीवर प्रथम ५० हजार द्वितीय ४० हजार तसेच तृतीय ३० हजार रुपये बक्षीस असेल. या योजनेबाबत माहितीसाठी कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य, संकेतस्थळ-www.krishi.maharashtra.gov.in किंवा संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. नाईकवाडी यांनी केले आहे.



डॉ. ना.ज.पाऊलबुधे कॉलेजमध्ये महात्मा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. (छाया– विजय मते)

# डॉ. पाऊलबुद्धे फार्मसीत महात्मा फुले पुण्यतिथी साजरी

नगर – वसंत टेकडी जवळील डॉ.ना.ज. पाऊलबुद्धे कॉलेज ऑफ फार्मसीत महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी श्री. फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी बी. फार्मसी चे प्राचार्य डॉ. श्याम पांगा यांनी विद्यार्थ्यांना महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनातील संघर्षा विषयी माहिती दिली. त्यांच्यामुळे आज आपण शिक्षण घेत आहोत समाजातील खालच्या स्तरातील मुलींसाठी पहिली शाळा सुरू करण्यात ज्योतिबा फुले यांचे मोठे योगदान होते त्यांनी जातीविरोधी चळवळीचा ही पुढाकार घेतला आणि स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रसार केला त्यांच्यामुळे आज तळागाळातील मुलांना शिक्षण घेता येत आहे असे सांगितले.

या प्रसंगी डी. फार्मसी कॉलेजच्या प्राचार्या अनुराधा चव्हाण यांनी महात्मा फुले यांच्या जीवन चरित्र बाबत सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी डी फार्मसी बी फार्मसीचे विद्यार्थी आणि फार्मसीचे शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# 'एकात्मिक फलोत्पादन विकास अभियाना'त शेतकऱ्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन

नगर – पिकांचे उत्पादन वाढविण्याच्या तंत्रज्ञानाची शेतकऱ्यांना माहिती होण्यासाठी तसेच उत्पादनांचे काढणीनंतरचे व्यवस्थापन, निर्यातीला चालना देणे या उद्देशाने एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून जास्तीत–जास्त शेतकऱ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत २०२४–२५ या वर्षासाठी मनुष्यबळ विकास घटकांतर्गत संस्थानिहाय शेतकरी प्रशिक्षणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. ३ ते ५ दिवसांच्या निवासी प्रशिक्षणासाठी प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास प्रति दिन एक हजार रूपये देण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमांतर्गत शेतकरी, क्षेत्रिय अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण, प्रात्यक्षिकांचे आयोजन तसेच, यशस्वी व प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतांना भेटी दिल्या जातात. राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्था, एनआयपीएचटी, तळेगाव दाभाडे या संस्थेमार्फत ठाणे, पुणे, कोल्हापूर व अमरावती विभाग येथे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्रामार्फत, राष्ट्रीय फलोत्पादन संशोधन व विकास संस्था (NHRDF) नाशिकचे आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, नागपूर येथील वरोरा, दापोली येथील हापूस आंबा गुणवत्ता केंद्र, पुणे येथील राहूरी डाळिंब गुणवत्ता केंद्र, छत्रपती संभाजीनगर येथील केशर आंबा गुणवत्ता केंद्र, नागपूर येथील संत्रा गुणवत्ता केंद्र येथे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

फळे व भाजीपाला रोपवाटीका, कृषी व्यापाराबाबत धोरण व निर्यातीबाबत माहिती, जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन (आंबा, चिकू, संत्रा व मोसंबी), ड्रॅगन फ्रुट व जिरेनियम व नाविण्यपूर्ण पिकांचे उत्पादनाचे तंत्रज्ञान, औषधी, सुगंधी व मसाला पिकांचे उत्पादन, प्रक्रिया व विपणन, हरितगृह, पॉली हाऊस व्यवस्थापन, हॉर्टीकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्स, काढणीपश्चात व्यवस्थापन (फळे व भाजीपाला), पीकनिहाय लागवड व प्रक्रिया (डाळींब, हळद व आले), या विषयावर प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांना प्रशिक्षण कार्यक्रमात साहित्य, चहा पान, भोजन व निवास व्यवस्था आदी सुविधा करण्यात येत आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे दिलेल्या संस्थांना किंवा अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

पुणे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्था, एनआयपीएचटी संस्था ( विश्वास जाणव, ०२११– ४२२३९८०/९४२३०८५८९४), कृषी विज्ञान केंद्र, बारामती जि.पुणे (यशवंतराव जगदाळे, ०२११– २२५५२२७/९६२३३८४२८७), राष्ट्रीय फलोत्पादन संशोधन व विकास संस्था (NHRDF), चितगाव फाटा, दारणा. ता. निफाड, जि. नाशिक, (डॉ. पी. के. गुप्ता ९४२२४९७७६४), आनंदनिकेतन कृषी महाविद्यालय वरोरा, जि. चंद्रपूर (डॉ. अनिल भोगावे ९५७९३१३१७९), हापूस आंबा गुणवत्ता केंद्र, दापोली (डॉ. महेश कुलकर्णी ८२७५३९२३१५), डाळिंब गुणवत्ता केंद्र, राहुरी (डॉ. सुभाष गायकवाड ९८२२३१६१०९), केशर आंबा गुणवत्ता केंद्र, छत्रपती संभाजीनगर (डॉ. जी. एम. वाघमारे ७५८८५३७६९६), संत्रा गुणवत्ता केंद्र, नागपूर (डॉ. विनोद राऊत ९९७००७०९४६) यांना संपर्क साधण्याचे आवाहन श्री.बोराळे यांनी केले आहे.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे ५ व ६ डिसेंबर रोजी आयोजन

नगर – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरू युवा केंद्र यांच्यामार्फत सीएसआरडी समाजकार्य महाविद्यालय येथे ५ व ६ डिसेंबर रोजी जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून महोत्सवात सहभागासाठी ३ डिसेंबरपर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी आमसिद्ध सोलनकर यांनी केले आहे.

या जिल्हास्तर युवा महोत्सवात संकल्पना आधारित बाबींमध्ये 'विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना' हा विषय आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत समूह लोकनृत्यासाठी वेळ मर्यादा १५ मिनीटे असून सहभागी कलाकार आणि वादकांची संख्या १० असावी. लोकगीत सादरीकरणासाठी ७ मिनीटे वेळमर्यादा असून पथकातील सहभागी कलाकार आणि वादकांची संख्या १० असावी. कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत कथालेखनासाठी एक हजार शब्दमर्यादा आणि १ तास वेळमर्यादा राहील. कथा पूर्वी प्रसिद्ध झालेली नसावी.

चित्रकलेसाठी वेळ मर्यादा दीड तास असून ए–३ आकाराच्या कागदावर चित्र काढण्याची मुभा राहील. वक्तृत्व स्पर्धेसाठी ३ मिनीटे वेळ असून हिंदी व इंग्रजी भाषेत आवडत्या विषयावर विचार मांडता येतील. कविता लेखनासाठी शब्द मर्यादा ५०० शब्द आणि वेळ मर्यादा एक तास राहील. साहसी उपक्रम, आरोग्य, युवकांसाठी विशेष कार्यक्रम, सामाजिक कार्यक्रम आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांची यूथ आयकॉन म्हणून निवड करण्यात येणार आहे. युवांनी या क्षेत्रातील आपल्या कार्याची माहिती २०० शब्दात पूर्ण पत्त्यासह द्यावी.

जिल्हास्तर युवा महोत्सवात प्रावीण्य प्राप्त केलेला संघ आणि युवा कलाकार यांना प्रावीण्य प्राप्त केल्यानुसार विभागस्तरावर आपली कला सादर करण्याची संधी मिळेल. त्यानुसार विभागावर प्रावीण्य प्राप्त झाल्यास राज्यस्तरावर व राज्यस्तरावरून प्रावीण्य प्राप्त केल्यास राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी होण्याची संधी प्राप्त होणार आहे. तसेच प्रत्येक स्तरावर प्रावीण्य प्राप्त झाल्यास शासनाकडून प्रावीण्य प्राप्त युवा कलाकार किंवा युवा संघास रोख पारितोषिक, सहभाग व प्रावीण्य प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

जिल्हा युवा महोत्सवात १२ जानेवारीपर्यंत वय १५ ते २९ वर्षे असलेले युवक व युवती सहभागी होवू शकतील. जन्मतारखेबाबत सबळ पुरावा म्हणून जन्माचा दाखला जोडणे आवश्यक आहे. तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचा रहिवासी असल्याबाबतचे आधारकार्ड किंवा रहिवासी दाखला जोडणे आवश्यक आहे.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करिता नाव नोंदणी बाब निहाय https://docs.google.com/forms/d/e/1FIpQLScxEx3fXNasDGTMWvj-X9wS3Tq2eHOmZVQRNfTCOXcRLpXw/viewform या लिंकवर ३ डिसेंबर पर्यंत करावी. विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाडिया पार्क, अहिल्यानगर येथे कार्यालयात प्रत्यक्ष किंवा dsoahmednagar01gmail.com या ई–मेलवर पाठविण्यात यावा.

अधिक माहितीसाठी राज्य क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरंगे (९८३४११५२५५) व प्रा.सॅम्युअल वाघमारे (८७८८४१२७८०) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी केले आहे.

# शहरातील गॅस एजन्सींकडून ग्राहकांची मोठी आर्थिक लूट

## ग्राहकांच्या शिल्लक टाक्या हॉटेलमध्ये ब्लॅकने विकल्या जातात

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील ज्या गॅस पुरवठा एजन्सी आहेत त्या मिळेल त्या पद्धतीने ग्राहकांची लूट करत असून घरोघरी गॅस टाकीचे वितरण करणारे जे कामगार आहेत ते ग्राहकांना सिलेंडर डिलेव्हरीची पावती देत नाहीत, अशी तक्रार आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषदेचे अध्यक्ष अमोल कोठारी यांनी केली आहे.

याबाबत पुरवठा अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गॅस सिलेंडरचे दर ८०६ किंवा ८१६ असतांना ८४०/८८० रूपये घेऊन ग्राहकांची फसवणूक करतात तसेच गॅस सिलेंडरमध्ये २/२ किलो गॅस कमी दिला जातो समजा एखाद्या छोट्या कुटुंबाला वर्षाला ३ किंवा ४ सिलेंडर १२ पैकी शिल्लक असलेले ८ गॅस सिलेंडर ब्लॅकच्या दराने १४०० ते पुरतात १५०० रूपयांना हॉटेलवाले किंवा इतरांना विकले जातात.

ग्राहकांना सिलेंडर देतांना वजन काट्यावर गॅस किती किलो आहे हे मोजून देणे बंधनकारक असतांना देखील मोजून दिला जात नाही. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी मानवाधिकार बाधित होणार नाही याची काळजी घेऊन नियमावली प्रमाणे गॅस वितरणाचे आदेश द्यावेत व लोकांची फसवणूक व लूट थांबवावी, अशी मागणी श्री. कोठारी यांनी केली आहे.

# जिल्ह्यातील २८ परीक्षा उपकेंद्राच्या परिसरामध्ये प्रतिबंधात्मक आदेश

नगर – महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त सेवा पूर्व परीक्षा २०२४ चे आयोजन १ डिसेंबर रोजी सकाळी १० ते १२ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत जिल्ह्यातील २८ उपकेंद्रांवर करण्यात आले आहे. परीक्षा उपकेंद्राच्या परिसरात कोणताही गैरप्रकार होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी केंद्रप्रमुख महाराष्ट्र लोकसेवा आयोग तथा निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांनी उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरामध्ये सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

परीक्षेसाठी १० हजार ९४ उमेदवार बसलेले असून ७ उपजिल्हाधिकारी दर्जाचे समन्वय अधिकारी, २ उपजिल्हाधिकारी दर्जाचे भरारी पथकातील अधिकारी, २८ उपकेद्रप्रमुख म्हणून वर्ग १ चे अधिकारी, ५६ सहायक, १०५ पर्यवेक्षक, ४६३ समवेक्षक, ९ लिपीक, २८ केअर टेकर, २८ बेलमन, ५३ शिपाई, १०४ पाणी वाटप कर्मचारी आणि ३९ वाहनचालकांची नियुक्ती करण्यात आली आहे.


परीक्षेस बसलेल्या उमेदवारांना सकाळी ८.३० वाजता प्रवेश देण्यात येणार आहे. उमेदवारांनी आयोगाने दिलेल्या सुचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. परीक्षा कक्षात मोबाईल, कॅल्क्युलेटर, डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन आदी दूरसंचार साधने आणण्यास आणि परिक्षा केंद्र परिसरात बाळगण्यास मनाई करण्यात आले आहेत. उमेदवारांनी परीक्षेसाठीची प्रवेशपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करायची आहेत. दुय्यम प्रवेश प्रमाणपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयातून देण्यात येणार नाहीत.

परीक्षा उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरामधील सर्व एसटीडी बुथ, फॅक्स, झेरॉक्स दुकाने बंद ठेवण्यात यावेत, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# संविधान सर्व समावेशक असून समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देणारे


## व्याख्यानात संविधानिक मूल्यांवर विचारमंथन, अहिल्यानगरमध्ये संविधान जागर महोत्सव उत्साहात साजरा

नगर – अहिल्यानगर शहरात मानवाधिकार अभियान, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण व सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था संयुक्त विद्यमाने तसेच समविचारी संघटनांच्या पुढाकाराने संविधान जागर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. शहरात संविधान जागर रॅलीसह संविधान जागर सभेच्या माध्यमातून व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.









अहिल्यानगर संविधानिक मूल्यांवर विचारमंथन प्रसंगी संविधान जागर महोत्सव प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून निघालेल्या रॅली प्रसंगी पुतळ्यास अभिवादन करताना डॉ. प्रकाश पवार. दुसऱ्या छायाचित्रात संविधान बचाव रॅली. तिसऱ्या छायाचित्रात उपस्थित जनसमुदाय.

सकाळी निघालेल्या या रॅलीमध्ये विद्यार्थी, विविध संघटना व संस्थांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, शासकीय अधिकारी व नागरीकांनी उत्स्फुर्तपणे मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून रॅलीस सुरुवात करण्यात आली. संविधान जागर महोत्सवाचे स्वागताध्यक्ष अशोक सब्बन यांनी रॅलीस संबोधित केले. शिवाजी महाराज पुतळा, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून सीएसआरडी सभागृह येथे संविधान जागर सभेच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

सुरुवातीस छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तेथे पत्रकारिता व समाजकार्याच्या विद्यार्थ्यांनी पोवाडे गात व 'संविधानाचा विजय असो, संविधान सर्वांसाठी, संविधान बचाव' घोषणा देत जनजागृती केली. रॅली माळीवाडा येथून, महात्मा फुले चौक येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

पुढे मार्केट यार्ड चौकात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व संविधान दिनाच्या घोषणा देण्यात आल्या. आकर्षक सजावट केलेल्या संविधान रथाने सर्वांचे लक्ष वेधले. त्यानंतर रॅली सीएसआरडी महाविद्यालयाकडे नेण्यात आली.

सीएसआरडीच्या सभागृहात पार पडलेल्या कार्यक्रमात पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश पवार यांनी संविधानाबाबत मार्गदर्शन करताना सांगितले की, रक्ताचा एकही थेंब न सांडता सामाजिक संबंधात बदललेली प्रक्रिया म्हणजे लोकशाही अशी व्याख्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. लोकशाही बरोबर संविधान तर संविधान बरोबर लोकशाही असून, संविधान हे लोकशाहीचा गाभा आहे. त्याला वजा केलं तर देशातील लोकशाही संपुष्टात येईल.

संविधान हे सर्व समावेशक असून समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम करते. त्यामुळे संविधान हे फक्त एका विशिष्ट घटकासाठी आहे असे म्हणणे चुकीचे असून संविधान सर्वव्यापी आहे. त्यामुळे संविधानाची मूल्ये आत्मसात करून समाजात एकात्मता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले ज्येष्ठ संविधान अभ्यासक सुभाष वारे बोलताना म्हणाले की, संविधान लागु होण्याआधी मुठभर लोकांना विशेष अधिकार होते. १९५० नंतर संविधान अमलात आणून सर्वांना समान हक्क देण्यात आले. संविधान खुप चांगले आहे परंतु ते फक्त पुस्तकांमध्येच सीमित न करता त्याला सत्यात उतरविण्यासाठी शांततामय व कायदेशीर मार्गाने संघटन उभारण्याची गरज आहे. आपल्या हक्काची लढाई लढण्यासाठी हे मोठे आव्हान असेल असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी संविधानाच्या उद्देशीकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

या प्रसंगी समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, पोलीस उपाधीक्षक गणेश उगले, महानगरपालिका आयुक्त प्रशांत खांडकेकर, महानगरपालिका उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी संविधाना बाबत मार्गदर्शन केले.

यावेळी संविधान जागर महोत्सव स्वागताध्यक्ष अशोक सब्बन, मानवाधिकार अभियानाचे प्रदेशाध्यक्षड. ॲड. संतोष गायकवाड, संध्या मेढे, सॅम्युअल वाघमारे, संजय कांबळे, युनुसभाई तांबटकर, प्रा. मेहबूब सय्यद, डॉ. प्रशांत शिंदे, डॉ. सुधाकर शेलार, शिवाजी नाईकवडी, हर्षल कांबळे, अर्षद शेख आदि विद्यार्थी व नागरिक मोठी संख्येने उपस्थित होते.

सॅम्युअल वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार युनिसभाई तांबटकर यांनी मानले.

